# द स्टींग ऑपरेशन

सत्याचे दुसरे नाव... अन्यायावर लेखणीचा घाव!

www.thestingoperationnews.com / Email - thestingoperationnews@gmail.com

संपुर्ण महाराष्ट्र, गोवा व कर्नाटक सिमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर प्रसारित होणारे प्रथम क्रमांकाचे आठवडापत्र


RNI NO. : MAHMAR/2012/45052 CDM/PUNE/SR/501/2012

पुणे ▪ वर्ष १३ वे ▪ अंक - ४ था (जोडअंक) ▪ दिनांक - सोमवार ११ ऑगस्ट ते रविवार १७ ऑगस्ट २०२५ ▪ पाने ४ ▪ किंमत : ५ रुपये


# एस. जयशंकर यांच्या राजीनाम्याची तयारी



## शशी थरूर होणार मोदी सरकार मध्ये नवीन विदेश मंत्री



**नवी दिल्ली /विशेष प्रतिनिधी**

**विदेश मंत्री एस. जयशंकर यांचा राजकीय बळी देण्यासाठी मोदी सरकारची सुरी तयार झाली आहे. फक्त बकरा कापण्याचा मुहूर्त शोधला जात आहे. आगामी एक महिन्यात जयशंकर यांच्या पदावर सूरी फिरवून काँग्रेसचे शशी थरूर यांना गोड जेवण देण्याची तयारी दिल्ली दरबारी जोरात चालली आहे. यासाठी थरूर आणि मोदी यांच्यात बंद दाराआड दीर्घ मिटिंगही झाल्या आहेत. मोदी यांच्या सांगण्यावरून थरूर यांचे विदेश दौरे वाढले आहेत. लवकरच शशी थरूर भाजपवासी होऊन नवीन विदेश मंत्री होणार आहे. याची भनक लागल्याने काँग्रेस मध्ये प्रचंड अस्वस्थता वाढली आहे पण मै मेरे पंखोसे उडान भरने मे समर्थ हू! असे उत्तर थरूर यांनी काँग्रेसला दिले आहे.**

**खळबळजनक**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या राजीनाम्याचा उतरता क्रम सुरु झाला आहे. सध्या भारताची विदेश नीती चारही बाजूने घेरली गेली आहे. पाकिस्तान, बांगलादेश, चीन आणि खाडी देश हे भारतापासून वेगळे राहण्याचा प्रयत्न करत आहेत, याची किंमत आता एस. जयशंकर यांना चुकवावी लागत आहे. खरंच चूक फक्त जयशंकर यांची आहे का? हा खरा प्रश्न आहे. मोदी सरकार प्रत्येक नीती, प्रत्येक योजना स्वतः ठरवत असताना जयशंकर यांचा फुकट बळी जात आहे. यांना बळीचा बकरा बनवत आहेत का? हे दिसेल. मोदी सरकारच्या जागतिक नेता ब्रँडला धक्का बसू नये, यासाठी हा खटाटोप सुरू आहे.सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, जयशंकर यांच्या गेल्यानंतर जे नाव समोर येतय ही नवी सुरूवात आहे की मोदी सरकारचा मास्टर स्ट्रोक आहे.

सुत्रांनुसार जयशंकर यांच्याकडे आता फक्त १५ ते २० दिवस शिल्लक राहिले आहेत आणि त्यांची जागा काँग्रेस मधले दिग्गज विदेशी प्रकरणातील महारथी, अभ्यासू आणि उत्कृष्ट इंग्रजीचे वक्ता शशी थरूर यांना देण्याचे ठरले आहे. काँग्रेसचा नेता बीजेपी मध्ये परदेशी मंत्र्याच्या जागेवर कसा? पण राजकारणात हे सर्व शक्य आहे. खरंतर मोदी सरकारला असा चेहरा हवा आहे जो आंतरराष्ट्रीय मंचावर अस्खलीत इंग्रजी बोलू शकेल आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आदर ही मिळेल आणि थरूरपेक्षा उत्कृष्ट चेहरा बीजेपी कड़े आता तरी नाही. हे काँग्रेसला समजल्यावर खळबळ उडाली आहे. पण थरुर यांनी काँग्रेसला लगेच उत्तर दिले आहे, 'मला उडण्यासाठी कोणाच्याही परवानगीची गरज नाही. पंख माझे आहेत आणि आकाश कोणाचेही नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे त्यांनी काँग्रेस पासून स्वतःला वेगळे मानले आहे आणि एका नवीन राजकीय स्वातंत्र्याची पहाट ते पाहत आहे. त्यांचे पंख भाजप सोबत उडण्यासाठी तयार आहेत. पण प्रश्न हा येतो कि परदेश नीती ची पूर्ण कमान पीएमओ कडे आहे तर फक्त जयशंकरांना बाजूला सारुन भारताची गणना आंतरराष्ट्रीय स्तरावर सुधारणार आहे का ? बांग्लादेशाने पाकिस्तानशी हात मिळवणे? इराणने आपल्या पासून लांब राहणे का अमेरिकेसमोर शांत रहाणे ही सर्व चूक जयशंकर यांची आहे की मोदींची! ही एकतर्फी नीतिची चाल आहे. मोदी सरकारमध्ये राजीनामे होत नाही हे सगळ्यांना माहित आहे. जोपर्यंत मोदींच्या प्रतिमेवर सरळ जोपर्यंत वार होत नाही तो पर्यंत कोणीही राजीनामे देत नाही त्यामुळे एक चेहरा बदलणे गरजेचे झाले आहे म्हंणजे जनतेला वाटेल काहीतरी बदल होत आहे आणि हेच कारण आहे की जयशंकर यांना बळीचा बकरा बनवला जात आहे आणि थरूर यांना बीजेपी मध्ये ओढले जात आहे. हे तेच थरूर आहेत जे आजही काँग्रेसचे सदस्य आहेत. ते आता पार्टी ऑफिस मध्ये जात नाही. काँग्रेस नेत्यांशी संबंध ठेवत नाहीत. उलट त्यांचे बोलणे काँग्रेस विरुद्ध असते आणि अजून एक कारण आहे की बीजेपी ला थरूर सारख्या उदारमतवादी चेहऱ्याची गरज आहे. ज्याने सर्वांना दाखवले जाईल की बीजेपी फक्त हिंदुत्ववादी पार्टी नाही. असा संदेश देण्याचा प्रयत्न आहे.थरूर यांना परदेश मंत्री बनवणे गरजेचे आहे का ही एक रणनीती आहे.आणि जयशंकर खरच असमर्थ राहिले आहेत का? हा संशोधणाचा विषय आहे. आता तरी सर्व संकेत हेच सांगतात कि मोदी सरकार एक मोठा चेहरा बदलत आहेत. जय शंकर जात आहेत थरूर येत आहेत.

# भाजपसाठी एकनाथ शिंदेंची एक्स्पायरी डेट फिक्स



**मुंबई** – राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यास भाजपच्या हिंदू मतांवर दावा सांगणारे एकनाथ शिंदे हवेत कशाला? असा प्रस्ताव दिल्ली दरबारी महाराष्ट्र भाजप कडून मांडला गेला आहे. यासाठीच तातडीने शिंदे यांनी दिल्ली वारी केली होती. त्यापेक्षा अजित पवार भाजपला सेक्युलर मते मिळवून देतील. ठाणे, भिवंडी, पालघर वागळता शिंदे यांचा करिष्मा महापालिका निवडणुकीत मुंबईत चालणार नाही. उलट ते भाजप च्या हिंदू मतांवर दावा सांगतील. त्यामुळे त्यांची भाजप कडून एक्सपायरी डेट फिक्स झाल्याची चर्चा आहे.

मुंबई महापालिका मिळिवण्यासाठी भाजप शर्थीचे प्रयत्न करीत आहे. यासाठी सर्व शक्यता पडताळणी सुरू आहे. भाजपच्या वाट्याच्या हिंदू मतदानात एकनाथ शिंदे यांना वाटा देणे परवडणारे नाही. त्यापेक्षा एकनाथ शिंदे यांनी वेगळे लढावे असा काहींनी सुर लावला. भाजप मुळेच एकनाथ शिंदे यांचे यावेळी आमदार निवडून आले.

अशात राज ठाकरे उद्धव ठाकरे एकत्र आल्यास भाजपला कसरत करावी लागेल. अजित पवार इतर मते मिळवून देतील पण एकनाथ शिंदे यांचा फारसा फायदा भाजप मधील अभ्यासकांना दिसत नाही. त्यामुळे शिंदे यांची एक्सपायरी डेट भाजपने फिक्स केल्याचे दिसते. हा राजकीय गुंता काही दिवसात उलगडलेला दिसेल.



## शिर्डीमध्ये 'नक्शा' प्रकल्पाची अंमलबजावणी

**शिर्डी** – केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भू-संसाधन विभागामार्फत देशभरातील १५२ शहरांत ड्रोनद्वारे हवाई सर्वेक्षण करून मिळकतींचे नकाशे तयार करण्याचा 'नक्शा' प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात येत आहे. राज्यातील १० नगरपालिकांमध्ये या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. यात शिर्डीचा समावेश करण्यात आल्याने शिर्डीत नक्शा प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

शिर्डीसह पंढरपूर, बारामती, कुळगाव - बदलापूर, वरणगाव, कन्नड, बुलढाणा, खोपोली आणि मूर्तिजापूर या नगरपालिकांमध्ये या प्रकल्पाचा प्रथम प्रयोग सुरू आहे. शिर्डी नगरपरिषद व राहाता भूमी अभिलेख विभागातर्फे प्रकल्पाची अंमलबजावणी शिर्डीत सुरू करण्यात आली आहे.

## तीन व्यापाऱ्यांनी १० कोटी रोख व ३६ किलो सोने लुटले

**मुंबई** – सोन्याच्या व्यवसायात गुंतवणूक करत चांगल्या परताव्याचं आमिष दाखवत मुंबईच्या झवेरी बाजार येथील तीन व्यापाऱ्यांनी अनेकांची फसणूक केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. तब्बल १० कोटींची रोकड आणि ३६ किलो सोने असा साधारण ४४ कोटी रकमेचा ऐवज लंपास केला आहे. प्राथमिक माहितीनुसार हा संपूर्ण ऐवज 'डब्बा ट्रेडिंग' मध्ये गुंतवण्यात आला होता, अशी माहिती लोकमान्य टिळक पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करताना देत या व्यापाऱ्यांविरोधात गुंतवणूकदारांनी दिली.

रक्कम बुडाल्याने तोटा झाला, असं कारण व्यापाऱ्यांनी देत हात वर केल्याची माहिती पोलिसांना देण्यात आली आहे.

शेअर बाजारात पैसे गुंतवण्याचे कैक प्रकार असून, डब्बा ट्रेडिंग हा त्यातलाच एक प्रकार. जिथं कोणत्याही अधिकृत नोंदणीशिवाय शेअर बाजाराबाहेर बेकायदेशीरीत्या ट्रेडिंग केली जाते. यामध्ये ब्रोकरकडून शेअर बाजाराच्या चौकटीबाहेर राहत पैसे गुंतवण्यासाठी प्रोत्साहित केलं जातं आणि या व्यवहारांवर कोणत्याही संस्थेचं नियंत्रण नसतं. परताव्याचा आकडा या पद्धतीच्या ट्रेडिंगमध्ये मोठा असल्याचं भासवत मोठी गुंतवणूक लाटण्याचं सत्र इथं बऱ्याचदा चालतं. पोलीस तक्रारीनुसार पश्चिम उपनगरात वास्तव्यास असलेल्या मॅक्सिस बुलियन आणि पल्लव गोल्डच्या लादुलाल, पल्लव आणि शुभम यांच्याशी झवेरी बाजारातील व्यापाऱ्यांशी ओळख झाली. त्यांनी आपल्याकडे व्यवसायासाठी चांगली योजना असून इथं दणदणीत परतावा मिळणार असल्याचं आश्वासन दिलं.

## हुंड्यासाठी रक्त येई पर्यंत विवाहितेला लोखंडी रॉडने मारहाण

**पुणे (सहकारनगर) :** कानपुर मध्ये राहणाऱ्या पीडित महिलेचे पुणे येथे २०२३ मध्ये लग्न हर्षल भुवड (राहणार सहकार नगर, पर्वती, पुणे) यांच्याशी झाले. पिडीतेच्या आई वडिलांनी रहाते घर विकुन मुलीचे लग्न थाटामाटात लावून दिले होते.

लग्नानंतर तीन- चार महिन्यातच सासु-सासऱ्यांनी हूंड्यासाठी छोट्या छोट्या गोष्टींवरून टोमणे मारणे, दिवस दिवस उपाशी ठेवणे, शरीरिक- मानसिक छळ, सतत पैशाची मागणी करणे. तिने नकार दिल्यावर मागणी पूर्ण होत नाही म्हणून लोखंडी रॉडने मारणे सुरू झाले. सासू, सासरे, नणंद आणि नवरा हर्षल भूवड हे सर्वजण अतिशय अमानुषपणे छळ करत होते, हे जेव्हा असह्य झाले तेव्हा तिने पर्वती, लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करायला गेली तेव्हा तिने महिला पोलिसांची मागणी केली, ती मागणी पूर्ण न करता सुभाष शिंदे (प्रमुख) तक्रार दाखल करण्याऐवजी तिचीच उलट तपासणी घ्यायला लागले. शेवटपर्यंत तक्रार दाखल करून घेतली नाही उलट दारू पिऊन घराबाहेर धिंगाणा घालत आहे असा तिच्यावर आरोप केले गेले.

## आधार लिंक नसल्याने बारा हजार लाभार्थी वंचित

**पुणे** – गरजू लोकांना आर्थिक मदत देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या संजय गांधी निराधार योजनेमध्ये जिल्ह्यातील सुमारे १२ हजार १६६ लाभार्थ्यांना आधार कार्ड बँक खात्याशी जोडलेले नसल्याने त्याच्या मासिक अनुदानापासून वंचित राहावे लागले आहे. राज्य सरकारकडून ६५ वर्षांखालील निराधार व्यक्ती, घटस्फोटित महिला आणि अपंगांना या योजनेंतर्गत दरमहा दीड हजार रुपये दिले जातात. सध्या जिल्ह्यात एकूण एक लाख नऊ हजार १८९ पात्र लाभार्थी आहेत.

## पायाला जखम आणि पोटाला टाके कसे?

**अमरावती** – पुरूषोत्तम सुरेश चौधरी (वय ३८,राहणार मंगरूर चव्हाळा नांनगाव खंडेश्वर, अमरावती) असे मृतकाचे नाव आहे.

पुरूषोत्तम चौधरी यांचा मंगरूर चव्हाळा या गावात त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला होता. अपघातात त्यांच्या पायाला किरकोळ मार लागल्याने त्यांना जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल केले होते. त्या दरम्यान २८ जून रोजी त्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. तेव्हापासून जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचार चालू असताना त्यांचा सोमवारी अचानक मृत्यु झाला. यावेळी नातेवाईक आणि गावातील नागरीकांनी रुग्णालय गाठले. पायाचे ऑपरेशन झाले तर पोटाला टाके कसे यावर शंका निर्माण करून मृतकाची किडनी काढल्याचा थेट आरोप डॉक्टरवर करण्यात आलाय.

सोबतच संताप येऊन शवविच्छेदन काहीवेळा करता रोखण्यात आले. नातेवाईकांची समजूत काढून शहर पोलिसांच्या देखरेखीखाली इन कॅमेरा शवविच्छेदन केले. ह्या घटनेवर जिल्हा सामान्य रूग्णालयात प्रभारी शल्यचिकित्सक डॉक्टर प्रीती मोरे यांना विचारणा केली असता या घटनेवर चौकशी समिती नेमण्यात आली.

शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यावरच स्पष्ट माहिती समोर येणार अशी प्रतिक्रिया आमच्या विदर्भ मतदारकडे स्पष्ट केली. मृतकाची किडनी खरच काढण्यात आली का हि सुद्धा खरी सत्यता अहवाल आल्यावरच स्पष्ट होणार आहे. मात्र घडलेल्या घटनेवर आणि नातेवाईकांनी केलेल्या आरोपानंतर आता पुन्हा जिल्हा सामान्य रुग्णालय वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे हे मात्र तितकेच खरे.




# कुंभ राशी

## भविष्य

क्रान्तिकारक, लेखक, दार्शनिक, वैज्ञानिक, मोठ्या उद्योगाशी संबंधित, अध्यापक, प्राध्यापक, इंजिनीअर, बांधा, ठेंगू, केस लवकर पांढरे होतात. डोके मोठे, कपाळ रूंद असते. चारित्र्य संशयास्पद असते. स्थार्थी, स्त्रीलंपट, एकापेक्षा अधिक विवाहामुळे वैवाहिक जीवनात त्रास राहतो. सुगंधी फुले व अत्तराचा शौक असतो. जीवनात आर्थिक स्थितीत नेहमी चढ-उतार पहावे लागतात. कुंभ राशीच्या व्यक्तींना ज्योतिषशास्त्र चांगले अवगत होते. यांनी वर्तवलेली वाईट भविष्ये खरी ठरतात. कुंभ राशीच्या महिला सुंदर पण उग्र स्वभावाच्या असतात. दुसऱ्यावर हुकूमत गाजविण्याची सवय असते. घरच्या लोकांपेक्षा इतर लोकांचे ऐकणाऱ्या व खर्चिक असतात.

## 'जातकाभरण चंद्र' निर्याणाध्याया प्रमाणे

कुंभ राशीच्या व्यक्ती दान धर्माच्या कार्यात पुढाकार घेतात. भाषा मधुर व कर्णप्रिय असते. शरीर स्वास्थ्य मध्यम असते. जसजसे आयुष्य वाढत जाईल तसतशी शारीरिक क्षमता कमी होते. संततीसुखाच्या बाबतीत उदास असतात. दोन विवाहाचा योग असतो. फारशी श्रीमंती येत नाही. उजव्या हातावर चिन्ह असते. जन्मापासून पहिल्या वर्षी शारीरिक त्रास असतो. ५ व्या वर्षी अग्निभय किंवा दुर्घटनायोग असतो. १२व्या वर्षी विष भय-सर्पभय असते. २८ व्या वर्षी चोरी होऊन नुकसान होते. आयुष्ययोग ९० वर्षाचा असतो.

## अनुभवसिद्ध फले

अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागते. प्रश्नांची उकल न होता उलट गुंता वाढतच जातो. अशा परिस्थितीत कोणी मदतीला येत नाही. भोगविलासात खूप खर्च करतात. कुटुंबाशी पटत नाही. संततीविषयी सारखी चिंता राहते. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्यांमुळे त्रास होतो. कोर्ट-कचेऱ्यात अपयश येते. पांढऱ्या व फिक्कट निळ्या रंगाची आवड असते. परस्त्री किंवा परपुरूषाविषयी आकर्षण असते. लोखंड, स्टील, अध्यात्म, तत्त्वज्ञान, अध्यापन, वकीली, राजकारण, डॉक्टरी व्यवसाय, पोलीसखाते. न्यायखाते, प्रिंटिंगप्रेस, फोटो स्टुडिओ, मेडिकल स्टोअर्स इत्यादि व्यवसायात यश मिळते.

## प्रत्येक वर्षाचा ऑगस्ट महिना

प्रत्येक महिन्याच्या ५.१०.१५. ३० तारखा मंगळवार पांढरा व पिवळा रंग-वस्त्रादि. वृषभ, कन्या, मकर या राशींचे स्त्री-पुरूष कुंभ व्यक्तींना प्रतिकूल असतात.

## जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा काळ

वयोवर्षे १५ ते २७ विवाह योग येतो. २२ ते ४० या कालखंडात जमीन- जुमला, संपत्ती व कुटुंबात वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होतील. ४१ ते ४२ आणि ४३ या वयोवर्षात आकस्मिक दुर्घटना, कुटुंबातील कोणाचा मृत्यू होईल. तुम्हाला स्वतः ला शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास जाणवेल. ४४ ते ६७ हा काळ अत्यंत प्रगतीचा जाईल. कोर्टकचेरीतील कामात दगदग होईल. व्यावसायिक कामकाज वाढेल. जर ट्रान्सस्पोर्टच्या धंद्यात रूची किंवा रस असेल तर या काळात अवश्य करावा. लोखंड व कोळश्याच्या व्यापारात फायदा होईल. ६८ ते ७१ शारीरिक स्थिती खराब होईल. एक गंडातंरच समजावे.

## विशेष उपासना

कुंभ राशीच्या व्यक्तींना आयुष्यात खुप संघर्ष करावा लागतो. खुप उतार चढाव पाहावे लागतात. कुंभ राशीचा रक्षक किंवा भक्षक शनि ग्रह आहे. याच शनिने आपल्या पित्याला, सूर्याला त्यांच्या सारथी व घोड्यासह काही काळ अंधळे बनवले होते. भगवान शंकराला कांही क्षण का होईना कैलासात लपायला लावले होते. कुंभ व्यक्तींचा सुख-दुःखदाता, रक्षक-भक्षक शनिच आहे. शनिचा त्रास कमी होऊन आयुष्य सुरळीत चालण्यासाठी शनिवारी पंगुना अन्नदान करावे. 'हनुमान कवच' व 'बजरंग बाण' नित्य पाठ करावा.

# तूळ राशी

## नावे

तौलि. वणिक, जूक, तुला, घट आणि इंग्रजित Libra (लिब्रा) कन्या राशीच्या दक्षिणे-पूर्वेकडे ही तुळ रास आहे. जेव्हा सूर्य या राशीवर असतो तेव्हा दिवस व रात्र सारखी असते. समानता, अनुरूपता व न्यायाचे प्रतीक ही रास आहे. बृहत्काया, व्यापारकुशल, धातुसंज्ञक, वायुतत्त्वाची पुरूष स्वभावाची, शुद्र वर्णाची, मृदू, चर व रजोगुणी अशी ही रास आहे. विपुल धन-वैभवानी परिपूर्ण अशा महानगरात, बाजार व्यापारीकेंद्र व सर्वोच्च न्यायालय, नाट्य व मनोरंजनाची स्थाने या ठिकाणी हिचा निवास असतो. वायुत्त्वाची, नीलवर्णप्रिय असलेली, वैश्य जातीची, दिवाबली. शीर्षोदय, अशा या राशीचा निवास कोललास देश (पश्चिम भारत) आहे. ह्या राशीचा स्वामी शुक्रवार व अंक ६ आहे. शरीरातील बेंबीखालचे अवयव, मूत्राशय ओटीपोट यावर या राशीचा अंमल आहे.

नीतीशास्त्र, धर्मशास्त्र, न्याय व स्मृतिशी या राशीचा संबंध असून रेशम वस्त्र, तीळ, गहू, हरभरा, तांदुळ, कापूस, तूर, एरंडी या वस्तूचे प्रतिनिधित्त्व ही रास करते. मेदिनीय ज्योतिषशास्त्रात ऑस्ट्रेलिया, पोर्तुगाल, जपान, तिब्बत, बर्मा, अर्जेन्टाइना इत्यादि देशांचे प्रतिनिधित्त्व तुळ राशीकडे देण्यात आले आहे.



## स्वाती नक्षत्राच्या जातकाची लक्षणे

स्वाती नक्षत्राच्या व्यक्ती चलाख, धर्मप्रिय व स्वभावाने कंजूस परंतु दिलदार मनाच्या असतात. मदिरा-मदिराक्षीत रमणाऱ्या, आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या सम-विषम परिस्थितीत प्रसन्न व अविचल राहणाऱ्या, राजकारण व इतर दोन व्यवसायांमधून पैसा मिळवणाऱ्या, काहीशा रागीट स्वरूपाच्या सगेसोयऱ्यांचे प्रेमी, व्यापारकुशल पर्यटनप्रेमी असे महाभाग स्वाती नक्षत्रावर जन्मलेले असतात. प्लॅस्टिक उद्योग, कापडउद्योग, बार-रेस्टारंट, फॅन्सी स्टोअर, आटोमोबाईल उद्योग, ट्रान्स्पोर्ट, पेंटिंग, फोटोग्राफी, तंत्र-मंत्र व ज्योतिष, बेकरी, स्टुडिओ, दूधडेअरी, स्वयंपाकी, अकौंटस-बँकिग, संगीत, कला, नाट्यकला, फिल्मइंडस्ट्रीज, वकील, इन्कमटॅक्स, सेल्सटॅक्स अधिकारी, सल्लागार इत्यादि क्षेत्रात स्वाती नक्षत्राच्या व्यक्ती आढळतात.

## भविष्य

वाहन उपवाहनाची आवड, पराक्रमी, दान-पुण्य व धार्मिक बाबतीत रस घेणारे, पुरुषार्थाने पैसा मिळवणारे, स्वतंत्र वृत्तीचे, नेतृत्त्वशक्तीचे धनी, न्यायप्रिय, सत्यभाषी, खरेदी-विक्रीत वाकबगार असे महाभाग तुळ राशीचे असतात. एकापेक्षा अधिक स्त्रियांशी यांचा संबंध असतो. व्यवहारात दोन नावाने लोक यांना ओळखतात. यांचा भाग्योदय उशीरा होतो. संततीसुख कमी असते. तुळ महिला खूप चंचल असतात. सुरईदार मान असते. समाजात लौकिक मिळवतात. शिस्तीच्या भोक्त्या असतात. यश व धन चांगल्या प्रमाणात मिळते.

## 'जातकाभरण चंद्र' निर्माणाध्याया प्रमाणे

तुळ राशीच्या व्यक्ती प्रतिष्ठित व कलात्मक वस्तूचा संग्रह करण्याचा छंद यांना असतो. ऐशोआराम व विलासी वृत्ती असते. निरनिराळ्या कलांचे ज्ञाते असतात. राजदरबारात चांगले स्थान यांना मिळते. सुरुचिपूर्ण भोजनाची आवड यांना असते. बहुधा दोन विवाह होतात. संतती कमी असते. खरेदी-विक्रीच्या व्यापारात खूप पैसा मिळतो. वयाच्या आठव्या वर्षी ज्वरतापामुळे व २० व्या वर्षी अपघाताचे भय असते. एकविसाव्या वर्षी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

कलाकार व कलाप्रेमी असतो. पत्नी नेहमी आजारी असते. शीघ्रकोपी असतात. वयाच्या ५५, ६०, ६३, ७०,७४, ७७ आणि ८१ व्या वर्षी अरिष्ट येते.

## अनुभवसिद्ध फले

शरीरयष्टी उंच, दीर्घनाक, आकर्षक चेहरा ही तुळ राशीची वैशिष्ट्ये आहेत. एक तरी संतती रोगी असते. व्यवसाय वारंवार बदलण्याची सवय असल्याने आयुष्यात खूप उशीरा स्थिर होतात. वितंडवाद घालण्याची प्रवृत्ती आढळते. गुप्तेंद्रियाचा त्रास असतो. पुरूषार्थी परंतु आळशी स्वभाव असतो. सौंदर्यप्रसाधने, कापड, कागद, स्टेशनरी, कटलरी, किराणामाल, फर्निचर, हॉटेल, लॉजिंग, बोर्डिंग, सराफी, दुकान, इत्यादि व्यवसायात तुळ राशीचे लोक यशस्वी होतात तर न्यायाधीश, वकील, बँक मॅनेजर, टॅक्स, प्रॅक्टिशनर म्हणून ही नाव कमवितात.

## कोणत्याही वर्षी एप्रिल महिना

कोणत्याही महिन्याच्या, ४,१४,१९,२४ तारखा गुरूवार. लाल रंगाची वस्त्र प्रावरणे इत्यादि. सिंह व कर्क राशीच्या व्यक्ती प्रतिकूल असतात.

## जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा काळ

वयाच्या १८ ते ३० या वर्षी विवाह होईल काही तुळ व्यक्ती अविवाहित राहतात. २८ ते ३२ भाग्योदयाचा काळ आर्थिक स्थिती चांगली राहील. ४३ ते ६८ शारीरिक त्रास, आवक-जावक यांचा मेळ बसणार नाही. कोणाकडून तरी फसवणूक होईल. बहात्तराव्या वर्षी गंडातर येईल.

## विशेष उपासना

भैरवस्तोत्र व भैरव पूजन करावे. खालील मंत्र रोज १०८ वेळा म्हणावा.

'तत्त्वनिरंजनायतारक रामाय नमः ||'

# धनु राशी

## नावे

ध्वनी, धनु, चाप, शारसण व इंग्रजी (सेजिटेरिअस) सम देहाची, करूणामय, पुरूष स्वभावाची, सौम्य, क्रूर, चंचल व शांत लक्षणाची, द्विस्वभावी, सत्त्वगुणी, अग्नितत्त्वाची व पिवळसर रंगाची, दिवसबली, अल्पसततीयुक्त, क्षत्रिय जातीची, पृष्ठोदयी विषम राशी आहे. या राशीचे निवास स्थान सैंधव देश असून स्वामी गुरू व अंक ३ आहे. शरीरातील दोन्ही जांघा, छाती व कुल्ले यावर या राशीचा अंमल आहे. शस्त्र, घोडे, वाहने व मीठ, कंदमुळ अटाटे, अन्न, वस्त्र, रबर, चरबी, कागद- विमा, व्यापार व समुद्रात उत्पन्न होणाऱ्या वस्तू व औषधी विज्ञान इत्यादि या राशीच्या वर्चस्वाखाली येतात. मेदिनीय ज्योतिषशास्त्रात स्पेन, अरब, ऑस्ट्रेलिया, हंगेरी इत्यादि देशांचे प्रतिनिधित्त्व धनु राशीकडे आहे

## मूळ नक्षत्राच्या महिलांची लक्षणे

मूळ नक्षत्रावर जन्मलेल्या महिलांचा बांधा मजबूत, धिप्पाड असतो. मांड्या, छाती व नितंब भारदार असतात. कुटुंबातील व्यक्तींशी यांचे पटत नाही. रागीट स्वभावाच्या व आपलेच खरे मानणाऱ्या असतात. धैर्यवान, धाडसी परंतु भोगविलासात मग्न असतात. सदाचारीपणा यांच्यात नसतो.

## मूळनक्षत्राच्या व्याधी व व्याधीमुक्तीसाठी दैवी उपाय

मूळ नक्षत्राचे पहिले चरण जातकाच्या पित्याला, दुसरे चरण जातकाच्या मातेला व तिसरे चरण जातकाला स्वतःला सांपत्तिक दृष्टीने अनिष्ट असते. चोथे चरण अशुभ नाही. म्हणून मूळ नक्षत्राचे १ ते ३ चरण असतील तर 'मूळनक्षत्रशांती ' करणे आवश्यक आहे. रक्तनासणे, फुफ्फुसातील शिरावर सूज येणे, पाठीच्या कण्याचा स्नायू दुखणे, डोके फिरणे, फिट्स येणे, हिस्टेरिया या सारख्या विकाराने मूळ नक्षत्राचे जातक त्रस्त होतात. योगक्षेम नीट चालावा व वरील आधी-व्याधीतून मुक्त होण्यासाठी खालील मंत्राचा कमीत कमी पाच हजार वेळा जप करावा व एक दशांश हवन करावे किंवा जाणकाराकडून करून घ्यावा.

**मातेव पुत्रं पृथिवी पुरूषमग्निगूं स्वेयोनाव भारूषा।**
**तां विश्वदेवेर्त्रनुभिः संवदानः प्रजापतिः।**
**विश्वकर्मा विमंचतु ऊं निक्रयते नमः ॥**
**'मन्दारमूळ' धारण करावे व वैडूर्य रत्न वापरावे.**

## भविष्य

धनु राशीचे जातक अनेक कलात पारंगत असतात. शारीरिक-मानसिक व बौद्धिकशक्ती उत्तम असते. स्वच्छ व स्पष्ट बोलणारे. एकांतप्रिय व संन्याशासारखे जीवन जगणारे अज्ञातवास, विषप्रयोग, मिथ्यापवाद, कारावास इत्यादिचे भय असते. हॉस्पिटल, अनाथाश्रम, कारागृह, समाजसेवी संस्था यांचे ट्रस्टी म्हणून हे काम करतात. दिर्घद्योगी, महत्वाकांक्षी, दूरदृष्टी व प्रामाणिकपणा यामुळे छत्तीस किंवा चाळीसाव्या वर्षी श्रेष्ठ पदी पोहचतात. यांचे नाक, कान, चेहरा व मान सर्व साधारण मोठी असते. नीतीला विशेष महत्व दतात. गुप्त शत्रूचा त्रास सोसावा लागतो. जनसंपर्क अधिकार असणाऱ्या व्यापारातून यांना पैसा मिळतो. धनु राशीच्या महिला स्थूल असतात. यांचे ओठही मोठे असतात. क्वचित प्रसंगी दात मोठे असतात. ज्ञानाने श्रेष्ठ, बाह व कंबरेखालचा भाग मजबूत असतो. पतीच्या कार्यात, हस्तक्षेप करण्याचा स्वभाव असतो. अपकिर्तीचे भय असते.

## अनुभवसिद्ध फले

धनु व्यक्ती धार्मिक आस्था, विश्वात, धाडस, उत्साह आणि दृढनिश्चयाने स्वतःच्या भाग्यवृद्धीकरिता प्रयत्नशील असतात. अध्ययनप्रिय, कलाप्रेमी, एकान्तप्रिय, स्वच्छताप्रिय, स्पष्टवक्ता, विनम्र, शांत, दयालु, परोपकारी, सौंदर्य प्रेमी, व्यवहारकुशल, गंभीर, परिश्रमी, श्रेष्ठजनात प्रिय, लेखन-भाषण कलेत पारंगत, अभिमानी, वाईट काम बेधडक करणारे, स्ववास्तू व वाहन सुख मिळते. विदेश यात्रा होते. स्वभाव हसरा व खोडकर असतो. शिकारीचा छंद असतो. यांचा नेम सहसा चुकत नाही. राजकीय क्षेत्रात मंत्र्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत मजल मारतात. प्रायव्हेट क्लासेसचे चालक, पुस्तकांचे लेखक, हायकोर्ट जज, शिक्षक, गणितज्ज्ञ, अकौंटंट, टेक्नॉलाजियन, ज्योतिषी, कीर्तनकार, इन्कमटॅक्स सल्लागार, इत्यादि व्यवसायात धनुव्यक्ती यशस्वी होतात.

## कोणत्याही वर्षाच्या जून महिना

प्रत्येक महिन्याच्या ३,९,१८,२४ तारखा, शुक्रवार. नीळा रंग -वस्त्र इत्यादि. कर्क, वृश्चिक, मीन राशीच्या व्यक्ती धनु राशीच्या व्यक्तींना प्रतिकूल असतात. धनु राशीच्या व्यक्तींच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा काळ १७ ते २६ किंवा ३० ते ३५ या वयात लग्न होईल. १८ ते ३७ या वयोवर्षात पैसा मिळेल. ख्याति, मानप्रतिष्ठा, वाढेल.

स्वतःचे घर होईल. सर्व क्षेत्रात दैदित्यमान यश मिळेल. ३८ ते ४७ या काळात अनेक वाईट प्रसंगाशी झुंझावे लागेल. ४८ ते ६० आर्थिक अडचण भासेल. कशात मन लागणार नाही. ६१ ते ६९ आर्थिक टंचाई दूर होईल. विविध लाभ मिळतील. सट्टा, लॉटरीद्वारे पैसा मिळेल. आयुष्ययोग पंचाहत्तर वर्षाचा राहील.

## विशेष उपासना

धनु राशीच्या व्यक्ती ग्रामदेवता, कुलदेवता, स्थानदेवता, वास्तुदेवता, यांच्या कोपामुळे दुःखी असतात. श्वास, उदरशूल, नाभिशूल, हृदयशूल, कटिशूल, इत्यादि व्याधीतून सुटका होण्यासाठी महामृत्युंजय जप रोज करावा.

'श्री देवकृष्णाय उर्ध्वान्तकाय नमः।' या मंत्राचा रोज १०८ वेळा जप करावा.

धनुराशीच्या जातकांना शनिग्रह मारक ठरतो म्हणून प्रत्येक शनिवारी उजव्या हातात एक खिळा ठेऊन खालील मंत्र १२ वेळा म्हणावा व मंत्र म्हणून झाल्यावर हातातील खिळा दक्षिण दिशेला फेकावा.

**लोह दंड समं दानं यम प्रीतिकरं शुभम्।**
**हे लोहलांगल दिनीत्वतः शान्ति प्रगच्छमे।**

# साप्ताहिक राशीफल

### मेष

तुमच्या चंद्र राशीपासून राहूच्या अकराव्या भावात असण्याच्या कारणाने आरोग्याच्या दृष्टीने, हा सप्ताहात तुमच्या आरोग्यासाठी सामान्य पेक्षा थोडे उत्तम राहणार आहे खासकरून, सप्ताहाची सुरवात उत्तम राहील कारण, या वेळी तुम्ही मानसिक आणि शारीरिक दोन्ही रूपात स्वतः ला बरेच स्वस्थ मिळवाल तथापि, या काळात मस्ती आणि पार्टी च्या वेळी तुम्हाला दारूचे सेवन करण्यापासून बचाव केला पाहिजे अथवा, आरोग्य खराब होऊ शकते. या सप्ताहात या राशीतील जातकांना खासकरून महिला जातकांना काही बोलण्याच्या वेळी वित्तीय देवाण-घेवाण करण्याच्या वेळी विशेष सावधान राहण्याची आवश्यकता असेल कारण, शक्यता आहे की, तुमच्या मासूम असण्याने घरातील कुणी व्यक्ती तुमच्याकडून आर्थिक सहयोग माघू शकतो आणि त्यावर तुम्हाला इच्छा असतांना ही नकार देता येणार नाही.

### वृषभ

तुमचे प्रतिरक्षा केंद्र या वेळी खूप कमजोर असेल म्हणून, आजारी होण्याच्या आधीच औषध घेऊन टाका परंतु, प्रत्येक समस्येचे स्वतःच घरीच इलाज करण्यापासून ही बचाव केला पाहिजे. तुमच्या चंद्र राशीपासून शनीच्या अकराव्या भावात असण्याच्या कारणाने, या सप्ताहात जर तुम्ही बऱ्याच वेळेपासून गुंतवणूक कराल तर, तुम्हाला उत्तम नफा मिळू शकतो तथापि, यासाठी तुम्हाला घरातील मोठ्या व्यक्तींचा सल्ला घेतल्यानंतर कुठला ही निर्णय घेण्याची आवश्यकता असेल. या सप्ताहात तुमच्या जवळ अश्या काही विपरीत परिस्थिती उत्पन्न होतील जेव्हा तुमचे कुटुंब आणि तुमचे मित्र एक स्तंभ प्रमाणे तुमच्या सोबत उभे राहतांना दिसतील कारण, ही वेळ तुम्हाला आवश्यक वेळ, मित्र आणि कुटुंबाचे सहयोग देण्याचे कार्य करेल. जे परदेशी देशांशी संबंधित व्यवसाय करतात, त्यांच्या करियरमध्ये प्रगती करण्यात काही कायदेशीर अडचणींमुळे त्यांना त्रास होऊ शकतो. म्हणून सुरुवातीपासूनच आपले कागदपत्र सज्ज ठेवून आपण त्यातून स्वतःला अनेक प्रकारे वाचवू शकता.

### मिथुन

या सप्ताहात आपल्या जीवनसाथीचे आरोग्य चांगल्या पद्धतीने लक्ष ठेऊन त्यांची काळजी घ्या कारण, शक्यता आहे की, त्यांचे अचानक आजारी होणे, कौटुंबिक शांततेला प्रभावित करण्यासोबतच, तुम्हाला उत्तम खाण्या-पिण्यापासून वंचित करू शकतात. तुमच्या चंद्र राशीपासून बृहस्पतीच्या पहिल्या भावात असण्याच्या कारणाने, विचार न करता तुम्ही कुणाला ही आपले पैसे दिले नाही पाहिजे अन्यथा, तुम्हाला येणाऱ्या काळात मोठ्या समस्येचा सामना करावा लागू शकतो म्हणून, आपल्या धनाचा योग्य वापर करण्यासाठी तुम्ही आपल्या घरातील मोठे किंवा वृद्ध व्यक्तींचा सल्ला घेऊ शकतात. या आठवड्यात कुटुंबात आपल्याला आपल्या भावंडांचा आधार मिळणार नाही.

### कर्क

या आठवड्यात आपल्याला काही दमवणाऱ्या कार्यांमधून वेळ काढावा लागेल, आराम करा आणि जवळच्या मित्रांसह आणि कुटूंबियांसह काही आनंदी क्षण व्यतीत करण्याची आवश्यकता आहे कारण, तुम्हाला आंतरिक आनंद देण्याबरोबरच तुम्हाला तुमच्या कामाची क्षमता वाढविण्याची संधी मिळेल म्हणून, तुमच्या शरीराला थोडा आराम देणे, तुमच्यासाठी उत्तम ठरणार आहे.तुमच्या चंद्र राशीपासून शनीच्या नवव्या भावात असण्याच्या कारणाने या सप्ताहात दुसऱ्यांच्या हिस्या मध्ये तुम्हाला आर्थिक दृष्ट्या काही मोठा फायदा होईल. या कारणाने तुम्ही काही नवीन घर किंवा वाहन खरेदी चा प्लॅन करू शकतात. नवीन सामान खरेदीने घरातील सदस्य तुमच्याशी आनंदी ही दिसतील. या आठवड्यात, जेव्हा तुम्हाला सर्वात जास्त गरज असेल.

### सिंह

या सप्ताहात तुम्हाला अनुभव येईल की, आस-पासचे लोक तुमच्याकडून अधिक मागणी आणि अपेक्षा करत आहे अश्यात, तुम्ही त्यांची प्रत्येक मागणी पूर्ण करण्यासाठी तुम्हाला स्वतः वर अतिरिक्त दबाव वाटेल परंतु, तुम्हाला हे समजण्याची आवश्यकता असेल की, जितके तुम्हाला शक्य असेल त्यापेक्षा अधिक वाचन कुणाला ही देऊ नका अथवा फक्त दुसऱ्यांना आनंदी करण्यासाठी स्वतः ला विनाकारण तणावात ठेऊ नका. या सप्ताहात तुम्ही लवकर धन कमवण्यासाठी काही प्रकारचे शॉर्ट कट वापरू शकतात यामुळे विनाकारण तुम्ही स्वतःला गैरकायद्याच्या गोष्टींमध्ये फसवाल. तुमच्या चंद्र राशीपासून शनीच्या आठव्या भावात असण्याच्या कारणाने परिणामस्वरूप, तुमच्या प्रतिमेला नुकसान सोबतच अतिरिक्त धन हानी होण्याचे योग बनतील.

### कन्या

तुमच्या चंद्र राशीपासून केतूच्या बाराव्या भावात असण्याच्या कारणाने घर आणि ऑफिस मध्ये काही अतिरिक्त दबाव, तुम्हाला रागीट बनवू शकते. या करणे तुम्ही दुसऱ्यांसोबत न बोलता वाद करतांना दिसाल. यामुळे तुमच्या प्रतिष्ठेवर प्रभाव पडेल सोबतच, मानसिक तणावात वृद्धी होण्याचे योग बनतांना दिसतात. या सप्ताहात आपल्या आई-वडिलांच्या मदतीने तुम्ही आपल्या पूर्वीच्या काही आर्थिक तंगीतून बाहेर निघण्यात यशस्वी असाल. तुमच्या चंद्र राशीपासून बृहस्पतीच्या दहाव्या भावात असण्याच्या कारणाने, तुम्हाला आपल्या मानसिक तणावापासून मुक्ती तर मिळेल सोबतच, तुम्ही आपली स्थिती सुधारल्या नंतर योग्य दिशेमध्ये आपले प्रयत्न करण्यात ही यशस्वी राहील.

### तूळ

या पूर्ण सप्ताहात वाहन चालवणाऱ्यांना विशेष सावधान राहण्याचा सल्ला दिला जातो कारण, तुमचा थोडा ही निष्काळजीपणा तुमच्यासाठी हानीकारण सिद्ध होण्याची शक्यता आहे. तुमच्या चंद्र राशीपासून शनीच्या सहाव्या भावात असण्याच्या कारणाने, या सप्ताहात तुमचे सातत्य आणि मेहनतीवर लोक कौतुक करतील आणि यामुळे तुम्हाला काही वित्तीय लाभ मिळण्याची शक्यता दिसेल तथापि, या वेळी शक्यता अधिक आहे की, तुमचा जीवनसाथी तुम्हाला आर्थिक मदत देऊन काही समस्येतून निघण्यात तुमची मदत करेल. या सप्ताहात घरात कुणी लहान मुलांचे आगमन होण्याने आनंद, कुटुंबात शांततेचे वातावरण सुनिश्चित करेल.

### वृश्चिक

या सप्ताहात तुम्हाला एक उत्तम आयुष्य जगण्यासाठी आपले आरोग्य आणि व्यक्तित्वात सुधार आणण्यासाठी सर्वात अधिक गरज आणि प्रयत्न करावे लागतील. तुमच्या चंद्र राशीपासून राहूच्या चौथ्या भावात असण्याच्या कारणाने, तुम्ही स्वतःला स्वस्थ ठेवण्यासोबतच, आपल्या प्रत्येक प्रकारच्या मानसिक तणावाने मुक्ती मिळू शकेल. या सप्ताहात तुमचे मित्र व जवळचे नातेवाईक तुमच्या प्रत्येक पाऊलावर सहयोग करून तुम्हाला प्रत्येक प्रकारची वित्तीय कठीण समस्येतून निघण्यात तुमची मदत करेल.

### धनू

या गोष्टीला तुम्ही या सप्ताहात चांगल्या प्रकारे समजू शकाल की, जर तुम्ही योग आपल्या दिनचर्येत शामिल करतात तर, तुमच्या बऱ्याच आरोग्य समस्या दूर होतील कारण, हा सप्ताह आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला आत्मचिंतन करण्याच्या बऱ्याच संधी देईल. जर तुम्ही आपल्या समजाने काम घेतले तर, या सप्ताहात तुम्ही अतिरिक्त धन कमावू शकतात कारण, यासाठी तुम्हाला योग्य रणनीती बनवण्याची आणि त्या अनुसार कार्य करण्याची आवश्यकता असेल. या सप्ताहात तुम्ही काही घरगुती खरेदी करण्यासाठी बाहेर जाऊ शकतात परंतु, तुम्ही गरजेच्या नसलेल्या गोष्टींवर अधिक खर्च करून स्वतः साठी बऱ्याच आर्थिक समस्या उत्पन्न करू शकतात.

### मकर

या सप्ताहात तुमच्या स्वभावात आपल्या आरोग्याला घेऊन थोडी अधिक सजगता पाहिली जाईल. या कारणाने तुम्ही आधीपेक्षा जस्ट खान-पान करतांना दिसाल म्हणून, आपले राहणीमान चांगले ठेवा आणि उत्तम आरोग्याचा आनंद घ्या. तुमच्या चंद्र राशीपासून केतूच्या आठव्या भावात असण्याच्या कारणाने, या सप्ताहात तुम्हाला प्रत्येक प्रकारची आपली गुंतवणूक आणि त्याने जोडलेल्या भविष्यातील योजनांना गुप्त ठेवण्याची सर्वात अधिक आवश्यकता असेल.

### कुंभ

या सप्ताहात तुम्ही आपल्या दिनचर्येमुळे बोर होऊ शकतात यामुळे तुमचे मन रोजच्या कार्यात काही वेगळे करण्याचे करू शकते. अश्यात तुम्हाला सल्ला दिला जातो की, काही खेळांच्या गोष्टींमध्ये उत्साहाने हिस्सा घेऊन तुम्ही आपल्या जीवनात नवीनपन आणू शकतात कारण, यामुळे तुम्हाला स्वतःला उत्तम ठेवण्यासोबतच, आपल्या रचनात्मक क्षमतेमध्ये सुधार आणण्यास मदत मिळेल. तुमच्या चंद्र राशीपासून राहूच्या पहिल्या भावात असण्याच्या कारणाने, या राशीतील व्यक्तींसाठी आर्थिक पक्ष बऱ्याच चढ-उतारानंतर, सामान्य होतांना दिसेल कारण, शक्यता आहे की, सप्ताहाच्या सुरवाती च्या दिवसात जरी तुम्हाला ठीक ठाक फळ परंतु, लहू लहू तुमच्या जवळ वेगवेगळ्या संपर्कांनी धन येतांना प्रतीत होईल म्हणून, भाग्याचा योग्य लाभ घेऊन, या सप्ताहात आपल्या धनाची बचत करण्याकडे आपले प्रयत्न करा.

### मीन

ताजे-तवाने राहण्यासाठी चांगल्या प्रकारे आराम करा कारण, या सप्ताहात तुमच्या जवळ पर्याप्त वेळ असेल, तर संधीचा फायदा घ्या आणि उत्तम आरोग्यासाठी पायी फिरायला जा आणि शक्य असेल तर, घरात राहून ही तुम्ही काही व्यायाम करू शकतात. प्रत्येक वेळेप्रमाणे या सप्ताहात ही तुम्ही घरातून बाहेर खूप सकारात्मकतेने निघाल परंतु, कारण नसतांना काही किमती वस्तू चोरी होण्यामुळे तुमचा मूड या वेळी खराब होऊ शकतो म्हणून, तुमच्या स्वभावात बदल होईल आणि तुमचे दुसऱ्यांसोबत या कारणाने वाद ही होऊ शकतात. या सप्ताहात कुटुंबातील मुले आणि म्हाताऱ्या व्यक्ती स्वतःसाठी अधिक वेळेची मागणी करू शकतात परंतु, या मागणीला पूर्ण करण्यासाठी तुम्ही पूर्णतः अयशस्वी असाल आणि त्यांना नाराज करू शकतात.

# ज्वारीच्या भाकरीचे महत्त्व

# !! रामबाण !!



मी आहारातून गहू काढून टाकला आणि माझं वजन १४ किलोनी कमी झालं. माझा दमा इतका बरा झाला की, मी माझे दोन इन्हेलर्स काढून फेकून दिले. गेली २० वर्षं अर्धशिशीमुळे माझं डोकं जे रोज दुखायचं, ते तीन दिवसांत दुखायचं बंद झालं. माझ्या छातीतली जळजळ आता थांबली. माझा इरिटेबल बाउल सिंड्रोम सुधारला, माझा अल्सरेटिव्ह कोलायटिस, माझा रुमटॉइड आर्थ्रायटिस, माझा मूड, माझी झोप वगैरे सुधारले.

गव्हामुळे तुमच्या रक्तातली साखर अत्यंत नाटकीय पद्धतीने वाढते. काही विदेशी संस्कृतींमधले लोक जे गहू खात नाहीत ते यामुळेच अधिक सडपातळ आणि निरोगी असतात.

## जेवणात का खावी ज्वारीची भाकरी ?

ज्वारीमध्ये कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असल्याने शरीरास पटकन ऊर्जा मिळते. कमी खाऊनही पोट भरल्याची जाणीव होते. ज्वारीमध्ये असणाऱ्या अमायनो ॲसिड्समधून शरीरास मुबलक प्रोटीन्स मिळतात. तसेच फायबर्स असल्याने अन्नाचे सहज पचन होते. बद्धकोष्ठतेचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाण्याची सवय लावून घ्यावी. त्यामुळे मूळव्याधीचा त्रास होत नाही.तसेच ज्यांना किडनी स्टोनचा त्रास टाळायचा असेल त्यांनी नक्कीच ज्वारीची भाकरी आहारात आणावी. ज्वारीतील पोषणतत्त्वामुळे किडनी स्टोनला दूर ठेवता येते. ज्वारीमध्ये असणाऱ्या निॲसिनमुळे रक्तातील कॉलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. तसेच ज्वारीमधील फायटो केमिकल्समुळे हृदयरोग टाळता येतात. ज्वारीमधल्या पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि मिनरल्समुळे रक्तदाब (ब्लडप्रेशर) नियंत्रणात राहतो. भाकरीत लोह मोठ्या प्रमाणात असते. ॲनिमियाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी ज्वारीची भाकरी खाल्ल्यास त्यांना फायदा होतो. लाल पेशींची वाढ होण्यास मदत होते.

## ज्वारीचे फायदे

१) ज्वारीत असणाऱ्या तंतुमय पदार्थांमुळे पोट साफ राहते.

२) ज्वारी पचनास सुलभ असल्यामुळे आजारी व्यक्तीस दूध भाकरी फायदेशीर ठरते.

३) ज्वारीमुळे पोटाचे विकार कमी होतात.

४) रक्तवाहिन्यांतील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करण्यासाठी ज्वारी उपयुक्त आहे.

५) हृदयासंबंधित आजारात ज्वारी अतिशय उपयोगी आहे.

६) शरीरातील इन्शुलिनची उत्पादकता कायम, योग्य प्रमाणात व कार्यक्षम ठेवण्यास मधुमेह असणाऱ्यास, तसेच इतरांनाही ज्वारीचा वापर उपयुक्त ठरतो.

७) शरीरातील अतिरिक्त चरबी, वजन कमी करण्यासाठी, कातडीचे आजार, जठरातील आम्लता कमी करण्यास उपयोगी.

८) महिलांच्या गर्भाशयाचे आजार, प्रजोत्पादन संस्थेचे विकार असणाऱ्यांना ज्वारी उपयोगाची आहे.

९) ज्वारीत काही घटक कर्करोगावर नियंत्रण आणतात.

१०) शौचास साफ होण्यासाठी ज्वारी अतिशय उपयोगी आहे.

११) काविळीच्या आजारात पचायला हलक्या अन्नाची आवश्यकता असते. त्यामुळे काविळीच्या आजारामध्ये व नंतर वर्षभर ज्वारीच्या भाकरीचे नियमित सेवन केल्यास फायदेशीर ठरते. ज्वारीला दररोजच्या आहारात प्राधान्य द्या, ज्वारीला चांगली किंमत मिळाली तर शेतकरी शेतात ज्वारीचे उत्पादन करीन, त्यातुन त्याला चांगले उत्पन्न आणी जनावरांना कडबा उपलब्ध होईल, ज्वारीचा आहारामध्ये अपयोग करा, रोग पळवा.


# विवाह एक भीषण परिस्थिती



पुढील काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण-तरुणी मोठ्या संख्येने दिसतील. वृध्द झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीचं न झाल्याने वृद्धाश्रमामध्ये जाण्याची किंवा एकाकी आयुष्य काढण्याची वेळ येणार, यात शंका वाटत नाही. अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी हि पिढी स्वतः बरोबर पालकांनासुद्धा आयुष्याच्या वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंताना जन्म देत आहे. कारण मुला-मुलींचे लग्न झाल्यावर पालकांची गृहस्थाश्रमाची जबाबदारी संपते. पुढील पिढीकडे सूत्रे देऊन पालक आपल्या निवृत्ती आयुष्याचे नियोजन करु शकतात. आता मागील एक पिढी आणि आताची विवाह न झालेली पिढी यांचे निवृत्तीचे आयुष्य खडतर असण्याची शक्यता जास्त आहे. फक्त पैसा, प्रॉपर्टी, दागदागिने, गाड्या म्हणजे सर्व सुख नाही. कौटुंबिक आयुष्यात चांगली-वाईट आव्हाने आणि संकटे यांना सामोरे जाताना पतीपत्नी एकमेकांचा मानसिक आधार असतात. जीवनात पूर्णत्वाच्या खऱ्या अर्थाने आनंद मिळवायचा असेल तर वाट्याला आलेलं दुःख किंवा प्रतिकुलता सुद्धा सुसह्य होते. ती एकमेकांच्या पूरक भूमिकेमुळे.

शिक्षणाची पात्रता, आर्थिक कमाई, जमीनजुमला, राहण्यासाठी स्वतःचे घर, सौंदर्याच्या व्यापक कल्पना, ठराविक भौगोलिक क्षेत्रात म्हणजे मुख्यतः पुणे, मुंबई, नाशिक येथेच वास्तव्य असावे. याचा दुराग्रह, हट्टापायी विवाहाचे वय निघून जात आहे. तारुण्याची किंवा ठराविक वयात वैवाहिक सौख्याची प्राकृतिक अनुकूलता आणि निरामय आनंदाला ही पिढी पारखी होत आहे. तेही आपणचं आपल्यावर लादून घेतलेल्या अटीमुळे. खरं तर बायोडाटा बघुन किंवा अभ्यासून त्यातील प्रतिकूल मुद्द्यांवर कशी मात करुन विवाहासाठी पार्श्वभूमी तयार करता येईल,याचा विवाहेच्छुक तरुण-तरुणींनी विचार गंभीरपणे करायला हवा. ठराविक बाबींचा अत्याग्रह हा आपल्या वैवाहिक आयुष्याला मारक आणि बाधक ठरत आहे आणि कल्पनांचे इमले रचूनही वास्तवात एकाकीपणे जगायची वेळ येत आहे. आयुष्याची संध्याकाळ जवळ आल्यावर हा विचार करण्यात आपण एवढी मोठी चूक केली त्याचे परिणाम वैयक्तिक आयुष्यावर तर पडणारचं आहेत.पण सामाजिक संतुलनसुध्दा बिघडणार आहे. आपल्या संस्कृतीला सुद्धा या बाबत मारक ठरत आहेत. स्त्री-पुरुषांच्या आयुष्याची पूर्णता ही वंशवृद्धी, मुलांचे संगोपन, शिक्षण, गृहस्थाश्रम आणि वानप्रस्थाश्रम या पायऱ्यांतूनच होत असते. आपण विवाह संस्थेचा पाया आणि ढाचा उखडून टाकत आहोत. आपले अपेक्षांचे दुराग्रह आपल्याला कुठे घेऊन जात आहेत.यावर गंभीर पणे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. लोकसंख्येत वृद्ध लोकांचे प्रमाण वाढल्याने जपान सारखे प्रगत, विकसित राष्ट्र गंभीर परिणामांना सामोरे जात आहे. घरातील वैयक्तिक विवाहाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टिकोनातून किती गंभीर आहे हे तेथील परिस्थितीचा अभ्यास केल्यास कळू शकेल. शेवटी जी तडजोड वय वाढल्यावर करणे अपरिहार्य आहे. त्यासाठी सगळे तारुण्य पणाला लावून अपेक्षांचे ओझे किती काळ वाहायचे एवढे करुन पुन्हा आपण केलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्याचं नाहीत तर मग इतका वेळ म्हणजे वाया गेलेली अमूल्य तारुण्याची वर्षे, घेतलेले efforts आणि वाढलेल्या वयाचे काय? कृपया संवादाचे पुल बांधून लवकरात लवकर वैवाहिक आयुष्याची स्थिरता कशी प्राप्त करता येईल.यासाठी काय पावले उचलावीत लागतील याचा मुळापासून विचार व्हावा.

अशी अपेक्षाआज अपेक्षेचे ओझे वाढवून नाहक मुला-मुलींचे वय निघून जात आहे.याची खंत ना मुलांना ना पालकांना. आजचा काळ ,आजची परिस्थिती काही वर्षांनी तशीच राहिल,हे सांगता येत नाही.आजचा पैसा,सुख,ऐश्वर्य, आरोग्य काही वर्षांनी तसेच राहिल हे सुध्दा सांगता येत नाही. पालकांनो आणि मुला-मुलींनो भविष्याचा विचार करुन आजच निर्णय घ्या. अपेक्षांच्या जंजाळात अडकून न राहता समजदारीने निर्णय घ्या.योग्य वेळेत,योग्य वयात विवाहाचा निर्णय घ्या.काळ निष्ठुर आहे,चुकीला त्याच्याकडे माफी नाही आणि नंतरच्या पश्तापाला अर्थ नाही.



एकदा एका पुणेरी मुलीचा पाय घसरून ती तलावात पडते.

ती ओरडू लागते, वाचवा... वाचवा... तिचा आवाज ऐकून एक मुलगा तिथं येतो म्हणतो, 'थांब, घाबरू नको. मी रस्सी फेकतो' मुलगी म्हणते, 'अरे रस्सी नाही, दोर म्हण आणि फेकतो नाही, टाकतो'

**मुलगी** – बरं, मग मी जातो. आता तुझ्या म मराठीच्या सरांना बोलव.

---

शाळेत असतांना एक मुलगा सारखा माझ्याकडे बघायचा, मी भाव खायचे! आता तो शिकून डॉक्टर झाला आहे. आता मी आजारी पडल्यावर त्याच्याकडे जाते, मेला आता मला बघायचे ५०० रुपये घेतो.

---

एक मुलगा लग्नासाठी पुण्यात मुलगी पाहायला जातो.

**मुलगा** – मला ना, काटकसर करणारी मुलगी हवी आहे.

**मुलगी** – मी साखरेच्या बिस्किटांवरची साखर काढून चहाला वापरते



# हत्तींची तीक्ष्ण बुद्धी

लॉरेन्स अँथनी हे दक्षिण अफ्रिकेतील कृतीशील आणि संवेदनशील प्राणीप्रेमी होते. दी एलिफंट व्हिस्परर या बेस्टसेलर पुस्तकासह त्यांनी प्राण्यांवरील तीन पुस्तके लिहिली. मानवी अत्याचारापासून त्यांनी जगभरात अनेक हत्तींना वाचवले आणि त्यांचे पुनर्वसन केले. त्यामध्ये २००३ मध्ये अमेरिकेने इराकची राजधानी बगदादवर आक्रमण केले तेव्हा तिथल्या प्राणीसंग्रहालयातील हत्तींना त्यांनी मोठ्या धैर्याने वाचवले.

७ मार्च २०१२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, नातवंडे आणि असंख्य हत्ती असा परिवार होता. त्यांच्या निधनानंतर दोन दिवसांनी जंगली हत्तींचा एक मोठा कळप त्यांच्या घराबाहेर येऊन उभा राहिला. त्यामध्ये दोन हत्तीणी होत्या. त्यांचे दोन कळप होते. त्यांच्या मनुष्यमित्राला भेटायला ते सगळे हत्ती आले होते. एकूण ३१ हत्ती आले होते. लॉरेन्स यांच्या घरापर्यंत पोचण्यासाठी त्यांनी तब्बल ११२ मैलांची पायपीट केली होती. हे सगळे पाहून जमलेले लोक केवळ आश्चर्यचकीत झाले नाहीत तर हत्तींमधील कुशाग्र बुद्धिमत्ता आणि संवेदनशीलता पाहून सगळेजण अवाक झाले. लॉरेन्स यांचे निधन झाल्याची संवेदना इतक्या दूरवर अगदी अचूकवेळी सगळ्यांना जाणवली होती. एवढेच नव्हे तर त्यांच्याबाबतची तीव्र आठवण त्या हत्तींमध्ये होती आणि त्यांनी त्यांच्या भावना अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने व्यक्त केल्या होत्या. एकामागे एक दोन दिवस चालत ते त्यांच्या अधिवासापासून लॉरेन्स यांच्या घरापर्यंत आले होते.

लॉरेन्स यांच्या पत्नी फ्रँकोईस हे सगळे दृश्य पाहून अतिशय भावूक झाल्या. पतीच्या निधनाच्या आधी हे हत्ती इथे आले नव्हते. एवढेच काय गेल्या तीन वर्षात ते हत्ती इथे आले नव्हते. तरीदेखील आपण कुठे चाललो आहोत हे त्यांना माहित होते.

अर्थात त्यांच्या जिवाभावाच्या मित्राला श्रद्धांजली वाहण्यासाठी ते इतक्या लांबून आले होते. त्यांच्यापैकी अनेकांचे जीव वाचवणाऱ्या लॉरेन्स यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी ते आले होते. काहीही न खाता दोन दिवस आणि दोन रात्री शांतपणे ते लॉरेन्स यांच्या घराजवळ थांबले आणि तितक्याच शांतपणे सकाळी उठून ते त्यांच्या अधिवासात निघून गेले. या जगात मानवी बुद्धिमत्तेच्या पलिकडे काहीतरी निश्चितपणे आहे.

## सकाळपासून रात्रीपर्यंत फिट राहण्याचा फॉर्म्युला

- सकाळची सुरुवात चहा-कॉफीने नाही तर उपाशी पोटी कोमट पाणी पिऊन करावी.
- मोकळ्या हवेत फिरा १०-१५ मिनिटे सूर्यप्रकाशात बसा, सूर्याशी मैत्री ठेवा.
- साखर व मीठ कमी कराः जास्त खाणे टाळा, आरोग्यासाठी हानीकारक !
- फळांचा आस्वाद घ्याः रसाऐवजी थेट फळे खा, अधिक फायदे मिळवा !
- आरोग्यदायी जेवणः दुपारी दही/ताक घ्या व रात्रीच्या जेवणात कोशिंबीर घ्या.
- जास्त खाणं व बसणं टाळाः अति खाणं आणि अति बसणं शरीराला हानी पोहोचवते !
- स्ट्रेंथ ट्रेनिंग कराः आठवड्यात किमान ३ दिवस व्यायामावर भर द्या.
- हंगामी अन्नाचा लाभ घ्या हंगामी फळे व भाज्या खा, शरीराला पोषण मिळवा.
- प्रोटीनची काळजी घ्या, प्रोटीन युक्त अन्न खा. डाळ, सत्तू, अंडी, पनीर खा! शरीरास अत्यावश्यक जीवनसत्वांना प्राधान्य द्या.
- न चुकता दहा मिनिट ध्यान करा. भरपूर हसा. आनंदी रहा, कुठलीही गोष्ट असो त्याकडे सकारात्मकतेने पहा, मार्ग सापडतात.

## तंदुरुस्त शरीरासाठी

- सकाळी लवकर उठा. किमान अर्धा तास व्यायाम करा. त्यामुळे तुमची शारिरिक क्षमता सुधारेल आणि शरीर प्रमाणबद्ध दिसू लागेल.
- रिकाम्या पोटी कधीही गरम पेये पिऊ नका. त्यामुळे पोटात वात धरण्याची शक्यता असते. त्याऐवजी कोमट पाण्यात लिंबू पिळून प्या. त्यामुळे शौचाचा मार्ग मोकळा होईल.
- सकाळी न्याहरीमध्ये शेंगदाणे आणि ड्रायफ्रूटचा समावेश करा. त्यामुळे दिवसभर शरीराला पौष्टिक घटक मिळतील.
- वर्तमानपत्रे, पुस्तके आणि विविध लेखकांचे ब्लॉग वाचा. त्यातून तुमचा शब्दसंग्रह वाढेल.
- तुम्ही दिवसभर काय केले याचा रात्री झोपण्यापूर्वी आढावा घ्या. त्यातून कुठल्या गोष्टींमध्ये सुधारणा करायची याची नोंद करा. ही चांगली सवय तुमच्यामध्ये अनेक चांगल्या सवयी निर्माण करेल.

## तशी ही माहिती नवी नाही

- जरी हे उपाय नवे नसले तरी आजच्या गृहिणींना ही माहिती नसते यामुळे आपल्या किचनमधील कामे झटपट व लवकर होतील.
- कांदा परतताना त्यात एक चमचा दूध मिसळावे. यामुळे कांदा करपणार नाही व रंगही छान येईल.
- सॅलड चिरण्यापूर्वी भाज्या थोड्या वेळ फ्रीजमध्ये ठेवाव्यात. भाज्या लवकर व योग्य आकारात कापल्या जातील.
- अंडे फेटण्यापूर्वी भांडे ओले करून घ्यावे. अंडे चिकटणार नाही.
- पनीर फ्रीजमध्ये मीठाच्या पाण्यात ठेवावे. यामुळे ते जास्त काळ ताजे राहील.
- जर आपण रवाळ तूप बनवू इच्छित असाल तर लोणी गरम करताच त्यावर पाणी शिंपडावे.
- लिंबू चिरण्यापूर्वी ते बोडा वेळ गरम पाण्यात ठेवावे. रस सहजतेने जास्त निघेल.
- जर आपण पुरीसाठी कणीक मळत असाल तर त्यात थोडीशी पिठीसाखर टाकावी. पुऱ्या चांगल्या फुगतील.
- ज्या लोकांना केळी लवकर पचत नसतात त्यांनी केळी खाल्ल्यानंतर वेलची खावी.

## महत्त्वाच्या काही गोष्टी

चेहरा, डोळे गरम पाण्याने धुणे हानिकारक असते. खूप थंडी असली तरी हे धुण्यासाठी थंड पाण्याचाच वापर करायला हवा.

जर आपण आठवड्यातील सहा दिवस ठरावीक वेळी संतुलित प्रमाणात आहार घेत असाल, तर सातव्या दिवशी मनपसंत पदार्थ खाऊ शकता व ते पचवूही शकता. याउलट आपण सहा दिवस कोणतेही पथ्य न पाळता स्वच्छंदीपणे खात-पित असाल, तर रविवारी उपवास करून फक्त फळे व दूधच घ्यायला हवे.

## हृदयाच्या ठोक्यांचे प्रमाण कसे मोजले जाते ?

हृदयाचे ठोके पडण्याचे प्रमाण प्राण्यांच्या शरीराच्या आकारमान व त्यांच्या रक्ताची उष्णता हे व्यस्त प्रमाणात असते.

उंदराच्या हृदयाचे ठोके दर मिनिटाला ६०० ते ७०० पडतात तर कॅनरी नावाच्या छोट्या पक्ष्याच्या हृदयाचे ठोके मिनिटाला १००० पडतात.

हत्तीच्या बाबतीत हेच प्रमाण मिनिटाला २० ते ५० पडते. व्हेल मासा हत्तीपेक्षा प्रचंड असून त्याच्या हृदयाच्या ठोक्यांचे प्रमाण हत्तीपेक्षाही कमी भरते. थंड रक्ताच्या प्राण्यांमध्ये बेडूक व कासव यांची गणना होते. बेडकाच्या नाडीचे ठोके मिनिटाला ३० तर कासवाच्या हृदयाचे ठोके २० पडतात.

## कानमंत्र

- लोणी कढवून तूप गाळल्यावर राहिलेल्या बेरीत वाटीभर पाणी घालून उकळावे. ते पाणी आणि थोडे मीठ, भात शिजताना घातल्यास भात मोकळा होऊन चवदार लागतो.
- भरली वांगी करताना, वांग्यांची देठे अधिक दळ ठेवून काढावीत आणि भाजी शिजताना घालावीत. ही देठे चोखून खायला चांगली लागतात.
- जेवणासाठी सॅलड, ताज्या पालेभाज्या व ताजी फळे भरपूर खा. त्यामुळे त्वचेचे सौंदर्य टिकून राहते.
- रोज आंघोळ झाल्यानंतर थोडेसे व्हॅसलिन ओठांना चोळा. दिवसभर ओठ मऊ राहतील.
- केस शांपूने घुतल्यानंतर कोरडे झाल्यानंतर त्यावर थोडेसे तेल टाका. कंगव्याने विंचरा. नंतर त्यांना बोटाने गुंडाळून नागमोडी वळण द्या.

## घरात ईशान्य कोपऱ्यात बाथरूम नसावे

- घराच्या केंद्रस्थानी बाथरूम नसावे. या ठिकाणी बाथरूम असल्यास कामांत अडचणी येतात. प्रगती खुंटते.
- ईशान्य कोपऱ्यात बाथरूम असेल तर मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो. तसेच घरातील जातकांना मानसिक अशांती राहते.
- बाथरूमसाठी उत्तम दिशा दक्षिण, पश्चिम व पूर्व मानली गेली आहे.

## मुरमे शरीराच्या विशिष्ट अवयवांना होणाऱ्या समस्या दर्शवू शकतात

- मोबाईल स्क्रीन आणि उशाचे कव्हर नियमित स्वच्छ करा.
- नाकावर (छैश) हृदय आणि रक्तदाब शारीरिक कारणे : रक्तदाब वाढल्यामुळे आणि कोलेस्टेरॉल जास्त असल्यामुळे नाकावर पिंपल्स येऊ शकतात. विटामिन इ आणि प्रथिनांची कमतरता.
- मानसिक कारणे : जास्त टेंशन घेणे आणि रक्तदाब वाढणे.
- काय करावे ?
- तेलकट पदार्थ कमी करा आणि व्यायाम करा.
- बीपी नॉर्मल ठेवण्यासाठी योग्य आहार घ्या.
- तोंडाभोवती आणि हनुवटीवर हार्मोन्स आणि प्रजननसंस्था शारीरिक कारणे : हार्मोन्सच्या असंतुलनामुळे महिलांमध्ये मासिक पाळीच्या वेळेस येथे पिंपल्स येतात आणि थायरॉईडसंबंधी समस्या.

# स्वप्नातील आजारपणाचे संकेत जाणून घ्या

- जर एखादी व्यक्ती स्वप्नात स्वतःला आजारी असल्याचे पाहत असेल तर तो तिच्या दृष्टीने उत्तम आरोग्याचा संकेत असतो.
- जर एखादी स्त्री स्वतः आजारी असल्याचे स्वप्न पाहात असेल तर ती लवकरच गर्भवती होईल.
- जर एखादी कुमारिका स्वप्नात आजारी असल्याचे पाहात असेल तर ती एखाद्यावर प्रेम करू लागेल व विवाहाबाबत चिंतेत राहील.
- जर असे स्वप्न एखादा कुमार पाहात असेल तर त्याचा विवाह एखाद्या सुंदर तरुणीशी होईल.
- आपली पत्नी स्वप्नात आजारी असल्याचे पाहणे अशुभ असते व ते एखाद्या कौटुंबिक संकटाचे सूचक असते.



- जर एखादी स्त्री आपला पती आजारी असल्याचे स्वप्नात पाहील तर तो दीर्घायुषी होण्याचे सूचक असते.
- जर एखादा आपल्या मित्राला रुग्णावस्थेत पाहात असेल तर ते मित्राकडून मदत न मिळण्याचे सूचक असते.
- जर एखादा त्याचा शत्रू रुग्ण असल्याचे स्वप्नात असल्याचे पाहात असेल तर त्याला त्या शत्रूवर विजय मिळण्याचे द्योतक आहे.
- जर एखादा रुग्ण स्वतः आजारी असल्याचे स्वप्नात पाहात असेल तर त्याचे वजन खूप कमी होईल.
- हेच स्वप्न एखादा कैदी पाहात असेल तर लवकरच त्याची तुरुंगातून सुटका होईल.
- जर एखादा विद्यार्थी स्वप्नात आजारी असल्याचे पाहात असेल तर तो परीक्षेत नापास होईल.

# सफाईची कामे महिलांना



गावांची सफाई करण्यासाठी राजस्थान राज्य सरकार नवीन प्रयोग करत आहे. याचा आराखडा तयार आहे. याला लवकरच लागू केले जाईल. राज्य सरकार राजीविकाशी निगडीत महिला सहाय्यता समूहांना गावांत सफाईच्या ठेक्यांची जबाबदारी देण्यावर विचार करत आहे. राज्यात १० हजार ग्राम पंचायती आहेत. तर ४३ हजारपेक्षा जास्त महसुली गावे आहेत. प्रथमच एखादे राज्य सरकार संपूर्ण देशात असे उदाहरण सादर करण्याच्या तयारीत आहे.

सरकारला वाटते की, महिलांबरोबर वेगवेगळ्या समूहांना जबाबदारी मिळाली तर मोठा आर्थिक, सामाजिक बदल घडून येईल. राजीविकाच्या अंतर्गत ३.६० लाख समूहांची स्थापना करून जवळपास ४३ लाख महिलांना याच्याशी जोडण्यात आले आहे.

### ९ हजार रुपये मानधन मिळेल

प्रत्येक ग्रामपंचायतीला एक लाख रु. प्रत्येक महिन्याला साफ-सफाईसाठी मिळत आहेत. सरकारने प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याला किमान ९ हजार रुपये मासिक मानधन निश्चित केले आहे. त्यामुळे सरकारची इच्छा आहे की, बचत गटांच्या माध्यमातून महिला हे काम आपल्या हाती घेऊन गावांना स्वच्छ करण्याचे काम करू शकतात.

# म्हातारपण



बाबा, जे काही मी बनवलंय ते शांतपणे खाऊन टाका. रोजच्या रोज तुमचे नखरे सहन करायला मी इथे बसलेली नाहीये... कविता बडबडतच खोलीतून बाहेर निघून गेली. सकाळच्या नाश्त्याची वेळ होती आणि कविताने थोडीशी करपलेली, कडक पोळी आणि कोरडी भाजी वाढली होती.

कमलेशजींनी फक्त एवढंच म्हटलं होतं, सूनबाई, या वयात दात साथ देत नाहीतग, थोडी मऊ पोळी द्यावी ना किंवा दूध द्यावं, त्यात भिजवून खाईन ना ग.

हे रोजचंच झालं होतं. ताटात खाण्यायोग्य जेवण क्वचितच असायचं. बनावट दात होते आणि पचनसंस्थाही कमजोर झालेली होती, त्यामुळे जर कधी खिचडी, उपमा किंवा काही मऊ पदार्थ मिळाला असता, तर जरा चवही बदलली असती आणि पचनातही आराम मिळाला असता.

पण त्यांचं जेवण जणू कुठल्या मुक्या प्राण्यापुढे अन्न टाकल्यासारखं वाढलं जायचं. करणार तरी काय? कमलेशजींनी मुलाच्या आग्रहाखातर गावातलं घर विकून टाकलं होतं आणि त्याच पैशातून शहरातलं हे घर घेतलं होतं. संध्याकाळी फिरायला गेले की पार्कमध्ये त्यांचे काही मित्र भेटायचे, जरा गप्पाटप्पा व्हायच्या. वृद्धत्वातील सुखद आठवणी आणि काळज्या यांचा खेळ चालूच असायचा.

आज कमलेशजी थोडे उदास वाटत होते. रंजन बाबूंनी ते ओळखलं आणि विचारलं, पण कमलेशजींनी तब्येतीचं कारण दिलं. घरातल्या गोष्टी सार्वजनिक करणे म्हणजे स्वतःच्याच घराची बदनामी होती. कोण काय बोलेल, कोण कसं समजून घेईल, ह्याचं काही सांगता येत नव्हतं.

त्यांच्या मनात विचार आला आपल्या संस्कारांवरच प्रश्न उभा राहील... आपण आपल्या मुलांना कसं वाढवलं? की ज्यांना आपल्या बापाचीच काळजी नाही! औषधं, जेवण सगळं काही त्यांच्याच कृपेवर चाललेलं आहे की..असा विचार करत करतच संध्याकाळी लवकरच ते घरी परतले.

रात्री जेवताना मुलाशी काही बोलायचं ठरवलं होतं, पण कविताने मध्येच बोलत म्हटलं, बाबा, त्यांना तरी शांततेने जेवू द्या. दिवसभर काम करतात ते. कमलेशजींनी काही न बोलता डोळ्यांत पाणी आणून जेवण केलं आणि आपल्या खोलीत गेले.

त्यांच्या मनात जुन्या आठवणी दाटून आल्या. ललिता तिच्या हाताने गरम गरम पोळ्या करत असे. प्रत्येकाच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन स्वयंपाक करत असे. या सुनेला ज्याचे नखरे वाटतात, त्याच मुलासाठी ललिता स्वतःच्या तब्येतीचा विचार न करता त्याच्या आवडीची दुसरी भाजी पण करत असे.

त्या रात्री त्यांना वाटलं, जणू ललिता त्यांच्याशी बोलत आहे, तुम्ही गावाला परत जा ओ... रामू (नोकर) तुम्हाला जास्त चांगलं सांभाळेल. ते विचारात पडले - रोज रोजची ही अपमानाची थाळी खाण्यापेक्षा मृत्यूच चांगला.

सकाळ झाली तसं त्यांनी ठामपणे ठरवलं - जो पर्यंत श्वास आहे, तो पर्यंत सन्मानाने जगावं.

नाश्ता आला, त्यांनी थाळी डोक्याला लावली आणि म्हणाले, सूनबाई, हे अन्न परत घेऊन जा.

कविताने तुच्छतेने विचारलं, काय झालं? आधी सांगितलं असतं भूक नाहीये तर, उगाच अन्नाची नासाडी नसती ना झाली.

कमलेशजी म्हणाले, सुनबाई इज्जतीची कोरडी भाकरी जास्त चांगली असते ग, बेईज्जतीच्या पकवानांपेक्षा . मी इथून निघून जायचं ठरवलंय. गावाकडे परततोय. जिवंत राहण्याइतका पैसा आहे, आणि जगणं शिल्लक आहे. आज सायंकाळचीच गाडी पकडतोय.

कविताचा थरकाप उडाला. जर रवी (पती) ला हे कळलं, तर तो तिच्यावर नक्कीच रागावेल. कमलेशजी समजूतदार होते, त्यांनी रवीला फक्त एवढंच सांगितलं - बेटा, शेताचं काही काम आहे, म्हणून जातोय. आणि एक गोष्ट लक्षात ठेव - नोकरीसोबत वडिलांसाठी वेळ काढणंही तितकंच महत्त्वाचं असतं बेटा.

रवी चिंतेत पडला. बाबा अचानक का जात आहेत? दिवसभर त्याचं मन कामात लागलं नाही. त्याने दुसऱ्या दिवशी गावाला जायचं ठरवलं. रात्री घरी येऊन त्याने कविताला सांगितलं, मी काही दिवस ऑफिसच्या कामासाठी जातोय.

कविता लगेच म्हणाली, मग मला पण घेऊन चल, जरा आउटिंग होईल. बाबांनी मला नुसतं बांधून टाकलं होतं इथं त्यांची सेवा करण्यासाठी.. आता सुटले एकदाची बंधनातून..

रवी बोलला, बंधन...? बाबांच्या उपस्थितीत काय बंधन होतं? खरं सांग - बाबांनी घर का सोडलं?

कविता चिडून म्हणाली, मी कंटाळले होते त्यांच्या नखऱ्यांना. काल तर जेवण सुद्धा परत केलं.

रवीला सगळं समजलं. तो म्हणाला, तू एकदा तरी फोन करून सांगायचं होतंस ना की बाबा काहीही न खाता घर सोडून गेलेत. मी उद्या गावाला जातोय. बाबांनी मला काहीच सांगीतलं नाही, पण मी त्यांचं मन नक्की जाणून घेईन.

कविताला पश्चात्ताप झाला. ती म्हणाली, चूक माझी आहे, मीच सुधारेल. मीही येईन बाबांना परत आणायला.

दुसऱ्या दिवशी दोघंही गावाला पोहोचले. तेव्हा कमलेशजी शेत विकण्याची तयारी करत होते. कविता त्यांच्या पायावर पडून रडत माफी मागू लागली. रवीही माफी मागू लागला.

कमलेशजी म्हणाले, बेटा, म्हातारपणात काय लागतय माणसाला - फक्त इज्जतीची भाकरी!! तुमच्या घरात ती पण मिळत नव्हती. म्हणून मी आता ठरवलंय की मी आश्रमात जाईन आणि माझ्या नातवंडांच्या नावावर पैसा ठेवीन. जेणेकरून त्यांना अशी वागणूक मिळणार नाही.

रवी म्हणाला, मला काही नको, पण कृपया एक संधी द्या. मी वचन देतो, तुमच्या सन्मानात कधीही कमी पडू देणार नाही. खूप विनवण्या करून रवी आणि कविताने त्यांना परत घरी आणलं.

सर्वांनी परत एकत्र राहायला सुरुवात केली. कविता आता कमलेशजींच्या सन्मानात कधीच कमी पडत नाही. रवीलाही वडिलांसोबत वेळ घालवायची सवय लागली.

हे खरं आहे - 'जसं कर्म तसंच फळ'. जे आज आपण आपल्या आई वडिलांशी वागतो, उद्या हीच वेळ आपल्यावर येईल.

# म्हातारीचा चौंदावा



म्हातारीचा चौदावा झाला आणि पोरानं घराला मोठा टाळा लावून म्हाताऱ्याला एस.टीत घालून कायमचा शहराकडे आणला. पण उभं आयुष्य रानामाळात गेल्यानं त्याच मन काही इथे रमत नाही. तो खुर्चीत बसून गरगर फिरणाऱ्या पंख्याकडं नुसता एकटक बघत राहतो. जगून झालेल्या आयुष्यावर विचार करत...

सकाळी पाच वाजता उठून अंथरुणात बसून राहतो. आतील नळाला पाण्याचा आवाज आला की बादलीभर थंड पाणी रापलेल्या देहावर मारून घेतो. तसा तो सहा पासूनच चहाची वाट पाहत बाहेरच्या हॉलमध्ये टांगलेल्या घड्याळाकडे बघत बसून असतो, आतल्या बेडरुमचा दरवाचा उघडण्याची वाट बघत कित्येक वेळा तो हलणाऱ्या मानेने आत डोकावूनही बघतो. मग एके काळी भल्या पहाटे बाहेरच्या चुलीवर म्हातारीने चहासाठी ठेवलेलं जर्मनचं पातेलं त्याच्या डोळ्यासमोर दिसू लागतं... दहा वाजता सुनेनं कपातून दिलेला चहा थरथरत्या हाताने घश्यात ओतून तो धोतर सावरत जिन्याच्या पायऱ्या उतरुन सोसायटीच्या गार्डन मध्ये थकलेल्या शरीलाला नेवून बसवतो. पलीकडून कानात हेडफोन घातलेली हॉफ पॅन्ट वाली एक बाई तिच्या इंग्लिश कुत्र्याला रिकामं करायला घेवून जाताना त्याला कोपऱ्यात दिसते. मग वस्तीवरच्या बंद घराबाहेर मागं एकटच उरलेल्या 'राजा कुत्र्याच्या' काळजीने म्हातारा कासावीस होतो. 'वस्तीवरचे शेजारी त्याला भाकरी घालत असतील का?' या एकाच विचाराने तो बराच वेळ शून्यात हरवून जातो. पार आतून घुसळून निघतो. ऐकुलता एक नातू पार्किंग मधे आलेल्या स्कुल बसने जाताना बाबा बाय बाय अशी आरोळी देतो तेव्हा मात्र जाड भिंगाचा चश्मा सावरत त्याचा थरथरता हात अलगद वर जातो आणि ऊर भरून येतो. दुपारी झोपून उठल्यावर सुन त्याला शिल्लक राहिलेली मॅगीच्या डिशमधून पुढे ठेवते. मग खाता खाता त्याला वस्तीवरच्या लिबांच्या झाडाखाली उन्हाळ्यात म्हातारीने वाऱ्यावर शेवयाचा सांजा मांडल्याचे आठवते. तसा तो म्हातारी गेल्यापासून प्रत्येक गोष्टीत तिला शोधू पाहतोय. रात्री उशिरा पर्यंत हॉलच्या सीलिंगला अंधारात चमकणाऱ्या निर्जीव चंद्र आणि चांदण्यात तो म्हातारीला शोधत राहतो. क्षणभर गावाकडं लेकीच्या घरी जावून राहता येईल का? असा विचार मनात येवून जातो. पण जावयाच्या दारात राहिलो तर गाव शेण घालील की तोंडात या विचाराने तो परत अस्वस्थ होतो आणि म्हातारीच्या जीवघेण्या आठवणीने त्याचा उरलेला सांगाडा या कुशीवरून त्या कुशीवर नुसता रात्रभर तळमळत राहतो.

स्वतःच्या इच्छा , भावना , महत्वकांक्षा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संवेदना ह्या सगळ्या गोष्टी आपल्या मनाचा समतोल राखत असतात आणि आपल्या मनाची संवेदनशीलता जेव्हा बधिर होऊन जाते न, तेव्हा आपण एका डिप्रेशनच्या फेज मधून जात असतो , तेव्हा आपल्याला आपल्या सुख दुःखाची पर्वा राहत नाही तर मग जगाच्या कशी राहणार ?

डिप्रेशनच्या अनेक वेगवेगळ्या फेज असतात ज्या की आजूबाजूच्या परिस्थिती वर अवलंबून असतात , पण सगळ्याची एक गोष्ट सारखी असते ते म्हणजे जगण्याची धडपड , आणि ती करतं राहणं गरजेचे असते .

अनेकदा डिप्रेशन मध्ये असताना नैराश्य सगळ्या मर्यादा ओलांडते आणि माणूस कळत नकळतपणे गुन्हेगारी, व्यसनांकडे वळतो, खरतरं हे डिप्रेशन आणि आलेल्या परिस्थिती पासून पळवाट काढणं असतं, डिप्रेशन मधून बाहेर पडण्यासाठी हा पर्याय कधीच असू शकत नाही पण ह्या सगळ्या गोष्टी टाळण्यासाठी मनाचा समतोल आणि संयम ठेवणं फार गरजेचे असते .

खरंतर स्वाभिमानी माणसाला स्वतः च्या तत्वाशी तडजोड करणं म्हणजे एक प्रकारे जिवंतपणी आलेलं मरणच असतं, पण जगण्याची उमेद माणसाला सगळं काही सहन करायला मजबूर करते, म्हणतात ना माणूस खूप स्वार्थी प्राणी आहे.जगण्याचा मोह त्याला शेवट पर्यंत सुटत नाही .

आपण स्वाभिमानी असतो पण वेळ काळ आणि परिस्थिती आपल्याला इतरांकडून मदत घ्यायला मजबूर करते आणि ती मदत वेळेवर परत नाही गेली

# डिप्रेशन म्हणजे नक्की काय असतं?

की, करणाऱ्यांची भाषा आणि वागणं दोन्ही बदलत तेव्हा जी लाचारता अनुभवतो न ती देव कोणाच्याही वाट्याला ती न देवो अशी असते , ती आपोआपच आपल्याला एका घुसमटीच्या कोंडवाड्यात लोटत नेणारी होती, आपल्याला माहीत असतं आपण प्रामाणिक आहोत पण म्हणतात ना उपकार बहोत कमिनी चीज होती है तेव्हा ऐकून घेण्याशिवाय किंवा शांत बसण्याशिवाय पर्यायच नसतो .

जेव्हा आपण अबोल अव्यक्त होतो न तेव्हा ती डिप्रेशन ची दुसरी पायरी असते त्या काळात मानसिक संतुलन अबाधित ठेवून येईल ती परिस्थिती , दिवस, माणसं सगळ्यांना शांतपणे समोर जाणं म्हणजेच डिप्रेशनशी अगदी दोन हात करणं असतं ,

अनेकदा डिप्रेशन हे व्यवसायात आलेल्या चढ उतारावर अवलंबून असतं, कधी आर्थिक परिस्थितीवर असतं तर बरेचदा ते कौटुंबिक गोष्टीवर अवलंबून असते आणि सगळ्याच गोष्टीमध्ये पैसा अडका धन दौलत ह्या महत्वाच्या गोष्टी असतात किंवा खोटी पद प्रतिष्ठा महत्वाची असते आणि ह्या गोष्टी हातातून सुटत जातात तसतसा हळूहळू तणाव वाढत जातो आणि जेव्हा माणूस अगदी शून्याजवळ येऊन थांबतो तेव्हा त्याची डिप्रेशनची तिसरी फेज सुरू होते आणि हा काळ अतिशय भयंकर असतो.

अगदी ज्यांना आपण आपले स्नेही ,शुभचिंतक हितचिंतक समजत असतो ते लोक जाणून बुजून तुम्हाला टाळू लागतात आणि ह्याच छोट्या छोट्या गोष्टी तुम्हाला दुखावत जातात त्या मनाला इतक्या लावून घेतो न आपण की त्यामुळे तुम्ही अजून निराशेच्या खाईत कळत नकळत ढकलले जातात, पैसा सर्वकाही अगदीच नसतो पण पैसा बरंच काही असतो आणि हे त्रिकाल बाधित सत्य आहे , तुमच्याकडे पैसा असेल तर तुम्हाला किंमत असते , नाही तर तुम्ही काय आणि कोण आहात ? किती चांगले आहात ? किती माणुसकी संपन्न आहात याला कवडीमोल भाव असतो.

अश्यावेळी मग माणूस आपोआपच अबोल होतो एकटे एकटे राहू लागतो अलिप्त राहणं पसंद करतो पण विशेष गोष्ट ही असते की, जी लोक कोणे एके काळी त्याच्या खूप जवळची असतात त्यांना आपल्या जिवलगाची अनुपस्थिती जाणवत देखील नाही हे सर्वात जास्त वेदनादायक असतं आणि तीच सल ती वेदना तुम्हाला अजून डीप घेऊन जाते डिप्रेशनमध्ये, ह्यातूनच अनेकदा आत्महत्येसारख्या गोष्टी घडतात आणि त्या जर टाळायचा असतील तर तुम्हाला बऱ्याच गोष्टी वेळेवर सोडून देऊन येईल त्या परिस्थितीला समोर जाणे गरजेचे असते तरचं तुम्ही जिवंत राहू शकाल, तुम्हाला जर का डिप्रेशनला हरवायचं असेल तर सगळयात अगोदर तुम्हाला निर्विकार होणे गरजेचे आहे म्हणजेच लोक तुमच्या बद्दल काय बोलतात याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून पुढे चालत राहणं , नाव बदनामी प्रतिष्ठा समाज ह्या गोष्टीला नको तितके महत्व दिले की तुम्ही मेलातच समजा , वाईट वेळ प्रसंग काही दिवसांसाठी असतात फक्त त्याकाळात एक भक्कम आधार मिळणं गरजेचे असते तुमच्या मनात घुसमट ऐकून घ्यायला एक हक्काची जागा हवी असते आणि तुम्हाला ती मिळाली तर समजा तुमची नौका पार झालीच .

खरतरं अविश्वास टोमणे ऐकायची तयारी तेव्हाच ठेवावी लागते जेव्हा तुम्हाला तुमच्या मेहनतीवर विश्वास असतो आणि तुमची नियत साफ असते , आपल्या चुकांचा दोष दुसऱ्यांना देत बसलो न तर कधीही आपण डिप्रेशन नैराश्य यातून बाहेरच पडू शकणार नाही , उलट आपल्या चुका आणि आजूबाजूची बोलणारी माणसं यातून शिकायचं असतं , चांगली माणसं गोळा करायची बाकी दिखावेबाज लोक आयुष्यात परत सामावून न घेता सोडून द्यायची असतात , आणि वेळ काळ परिस्थिती कशीही असली तरीही तुमच्यावरचा विश्वास तसूभरही कमी न होता अगदी खंबीरपणे तुमच्यासोबत राहणारी माणसं जमवत राहणं म्हणजे तुमचं तुम्हीच तुम्हाला जिवंत ठेवणं असतं ,

आणि ह्या सगळ्या काळात येणारी नकारात्मकता नैराश्य ह्या गोष्टीचा देखील समतोल खासकरून राखावा लागतो हे विशेष. सकारात्मकता शोधत राहावं तेव्हाच ह्यावर मात करून ह्या सगळ्यातून बाहेर जो पडतो न तो अगदी कणखर मजबूत आणि माणुसकी संपन्न माणूस असतो फक्त मनाला समजवत राहायचं, जातील हेही दिवस निघून आयुष्य खरंच खुप सुंदर आहे आणि ते आपल्या आसपासच्या माणसांनी अजून सुंदर भासू लागतं.

# नातेवाईक

एका नातेवाईकासाठी खारघरच्या टाटा कॅन्सर हॉस्पिटलला तीन चारदा जाणं झालं. प्रत्येक वेळी हॉस्पिटलमध्ये शिरताना काळजात धस्स होत होतं. सगळ्या वयोगटातील माणसं. श्रीमंत, गरीब सगळीच एका लायनीत बसलेली. एकसमान धागा असलेली. कॅन्सर. काही प्रकारचे कॅन्सर बरे होतात. कॅन्सर कोणत्या स्टेजवर आहे, कोणत्या अवयवाला आहे यावरही व्यक्ती पूर्णपणे बरी होईल की नाही हे अवलंबून असतं हे माहिती असतंच आपल्याला. तरी इथं आलं की अस्वस्थ होतं.

इथं आलेली ही सगळी माणसं मृत्यूबद्दल आपल्याला काहीतरी सांगतात असं वाटतं... इथे येणारी जवळजवळ सगळीच माणसं मृत्यूला स्पर्शून, भयानक वेदनेतून परत आलेली असतात तर काहींच्या आयुष्याचे किती दिवस बाकी आहेत हे त्यांना, त्यांच्या नातेवाईकांना कळलेलं असतं. कल्पनाही करवत नाही. या वातावरणात जायला मन तयार होत नाही. इथल्या वातावरणात आल्यावर श्वास बंद पडेल अशी भीती वाटू लागते.

या माणसांच्या नजरेला नजर देण्याची हिंमत होत नाही. त्यांची वेदनेची गोष्ट ऐकाविशी वाटत नाही. इथे येणारी प्रत्येक व्यक्ती आत्यंतिक टोकाची वेदना सहन करून आलेली असते किंवा सहन करत असते. आता अनेकांना आयुष्यही नको आणि वेदनाही नको वाटू लागतं. किमो, रेडिएशन फक्त माणसाचं शरीरचं खरवडून काढत नाही तर मनही बोथट करतं. अंथरुणात संडास, लघवी होणं, अन्नाचा एकही कण पोटात न जाणं, सतत उलट्या, डोकेदुखी, पोटदुखी, चक्कर येणं, सर्जरी आणि त्यासोबतच्या वेदना या सामान्य बाबी. आयुष्यभर कुणावरही अवलंबून न राहिलेली, ताठ कण्याची माणसं अशा आजारानं उन्मळून पडतात. लाज, शरम, अस्वस्थपणा, अव्हेरलेपण, अपमान या सगळ्यातून जात असतात. घरात करणारं, समंजसपणे जबाबदारी घेणारं कुणी असेल तर वेदना सहन करायला बळ येतं. नाही तर ही माणसं स्पष्ट, अस्पष्टपणे मरण मागतात.

ज्यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली असते ते कर्ज काढतात, हातउसने घेतात. ते फेडण्यासाठी घर, जमीन विकतात. कधीकधी घरातली सख्खी, जवळची माणसं आपल्याच माणसांवर खर्च केलेले पैसे दामदुपटीनं वसूल करतात. मरताना त्या माणसाला रक्ताची नाती शरीराच्या वेदनेबरोबर काळजाच्या वेदनाही देतात. सुखानं मरूही देत नाहीत. जगण्यासाठी धडपड करणारी इथली माणसं पाहिली की आपल्या निरोगी शरीराचं, जगणं असण्याचं मोल कळतं. खरं तर असा त्रास कुणाच्याच वाट्याला येऊ नये. पण मला सगळ्यात जास्त वाईट या पिटुकल्या मुलांचं वाटतं. खेळण्याच्या, मस्ती करण्याच्या वयात यांची असह्य वेदनेशी गाठ पडते. मला खूप दुखतंय, त्रास होतोय, यापलिकडे ही बिचारी लेकरं काय बोलणार? ही मुलं किमो, रेडिएशन कशी सहन करत असतील, यांना किती दुखत असेल असा विचार मनात येतो.

स्ट्रेचरवर केस नसलेली, वाळून गेलेली मुलं पाहिली की हुंदका येतो. हाताला सलाईन लावून पायऱ्यांवर खेळणारी, आई बापांच्या अंगावर पहुडलेली, शून्यात नजर लावून गुपचूप बसलेली मुलं पाहिली की ती काय विचार करत असतील असा प्रश्न पडतो. यांच्या डोळ्यात पाहिलं की. का?गरज नव्हती ना. प्लीज नको. असं वाटल्याशिवाय राहवत नाही. आपल्याच जगण्याचा राग येऊ लागतो. त्यांचे फोटो काढताना हात आणि मन थरथर कापत होतं. एक प्रकारचा अपराधीभाव. इथं करुणाही कामी येत नाही.निसर्गानं यांना वेदनारहित, आनंदी आयुष्य जगू द्यायला हवं होतं. यांना चांगले उपचार मिळून ही सगळी लेकरं कॅन्सरमुक्त व्हावीत असा मनातल्या मनात, आतून आवाज येतो. सगळीच माणसं.

इथून आता तुम्ही कॅन्सर मुक्त झाल्या आहात, पण काळजी घ्या, असं ऐकून बरी होऊन जाणाऱ्या काही माणसांच्या चेहऱ्यावरील वेदनेतून मुक्तीचा निःश्वास तेवढाच काय तो मनाला हिरवेपण देतो.

ज्यांची माणसं यातून बरी होतात, ते नातेवाईक त्यातल्या त्यात सामान्य आयुष्य जगू शकतात, मात्र ज्यांची माणसं कॅन्सरच्या तडाख्यातून वाचत नाहीत त्यांना आपल्या माणसाला आपण वाचवू शकलो नाही ही बोचणी आयुष्यभर राहते. कॅन्सरच्या या वेदनेच्या प्रवासात कॅन्सर झालेली माणसं, त्यांचे नातेवाईक खूप हिंमत दाखवतात. या लहान मुलांच्या आई वडिलांच्या मानसिक अवस्थेचा तर विचारच करवत नाही. पैशांची जुळवाजुळव कशी करत असतील? (तरी टाटामध्ये खूप वाजवी दरात, मोफतही उपचार होतात. इथं संवेदनशील वागणूक, मार्गदर्शन, सहकार्यही मिळतं. टाटासारखी अनेक हॉस्पिटल उभे राहण्याची गरज आहे. तेही सरकारी. कॅन्सर हॉस्पिटलमधील हजारो कॅन्सर पेशंट पाहिल्यावर अशा हॉस्पिटलची किती गरज आहे हे लक्षात येईल. केमिकल्स, प्रदूषण, तंबाखू सेवन यामुळं कॅन्सरचं प्रमाण अजून वाढत आहे.) आपल्या लेकराला अशा वेदनेत पाहून त्यांच्या काळजाला गरे पडले असतील? लेकरू त्रास होतोय म्हणून रडत असेल तर यांचा जीव किती कळवळ करत असेल? रडून रडून यांचे अश्रू संपले असतील की अजूनही रोजची रात्र उशी ओली करून संपत असेल? यांना आपलं काळीज किती घट्ट करावं लागत असेल? आपल्या लेकराला असा आजार का झाला असेल हा प्रश्न ते कुणाकुणाला विचार असतील? देवाला, डॉक्टरला? माणसांना? स्वतःला? आपल्या लेकराचा जीव आपण वाचवू शकणार नाही या विचारानं हे रात्रं दिवस हवालदिल होत असणार. आपल्या लेकरांच्या वेदना आपल्याला मिळोत अशी प्रार्थना ईश्वराकडं, मनाला करत असतील का? सगळी माणसं निरोगी राहावीत!

**लक्ष्मी यादव**



# ज्ञानेश चौधरीला आदर्श विद्यार्थी बहुमान

**मुंबई /प्रतिनिधी**

प्राचार्य जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्था, महात्मा गांधीं विद्या मंदिर, बांद्रा (पूर्व) येथे इयत्ता सातवी वर्गात शिकणारा ज्ञानेश सारिका निलेशचंद्र चौधरी यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा आदर्श विद्यार्थी हा बहुमान देण्यात आला.

कै. गोविंदराव कांडलीकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आदर्श विद्यार्थ्यांस दरवर्षी पारितोषिक देण्यात येते, या वर्षी हा बहुमान ज्ञानेश चौधरी या विद्यार्थ्यांस देण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक संजय चव्हाण, पर्यवेक्षक शिहरनाईक सर, वर्ग शिक्षक श्राजेश गिरकर, श्रीमती हुले मॅडम व शाळेतील शिक्षक व शिक्षकांनी



त्यांचे अभिनंदन केले आहे. पुढील वाटचालीत शुभेच्छा दिल्या. ज्ञानेश नी चार वर्षांत वेगवेगळ्या स्पर्धेत ३५० प्रशस्तीपत्र मिळिवले, तसेच ६५ मेडल व ४७ ट्रॉफी, भेटवस्तू,रोख रक्कम सुद्धा मिळिवल्या, या विद्यार्थ्यांने वकृत्व व प्रकल्प स्पर्धेत आपल्या शाळेचे नाव मुंबई शहर व मुंबई उपनगरात सुद्धा गाजवले. याचे सर्व श्रेय तो मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षिका यांना देतो. आईवडिलांचे दर्शन घेऊन तो दिवसाची सुरूवात करतो. अमरावती जिल्ह्यातील वाढोणा रामनाथ येथील प्रतिष्ठित नागरिक मोरेश्वर चौधरी यांचा तो नातू आहे.

# कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरीसाठी फसवणुकीचे प्रकार वाढले

कंपन्यांना बनावट नोकरीचे रेकॉर्ड, खोटी शैक्षणिक पात्रता, एकाच वेळी अनेक नोकऱ्या करणे (मूनलाइटिंग) आणि एआयच्या साहायाने बनावट डॉक्युमेंट्सच्या (डीपफेक) वाढत्या घटनांना सामोरे जावे लागत आहे. देशातील कंपन्या मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान वापरत असताना, आता नोकरीसाठी फसवणुकीचे प्रकारही वाढताना दिसत आहेत. यामध्ये बनावट रोजगार नोंदी, खोट्या शैक्षणिक पात्रता, एकाच वेळी दोन नोकऱ्या करणे (मूनलाइटिंग), तसेच ऑनलाइन मुलाखतींसाठी एआयच्या साहायाने बनावट डॉक्युमेंट्स (डीपफेक) तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश आहे. ऑनलाइन घेतल्या जाणाऱ्या इंटरव्ह्यूमध्येही हे अनुभव अनेक कंपन्यांना येत आहेत. एका प्रसिद्ध सल्लागार संस्थेच्या अहवालात हे निष्कर्ष स्पष्टपणे मांडले आहेत.

नोकरीसाठी आयटी, आर्थिक, आरोग्य आणि व्यावसायिक सेवा, बीपीओ व केपीओ या क्षेत्रात गेल्या वर्षभरात पार पडलेल्या नोकरी प्रक्रियांच्या पार्श्वभूमीवर सर्वाधिक फसवणुकीचे प्रकार झाले आहेत. हा अहवाल, 'फर्स्ट लाईन ऑफ डिफेन्स रिपोर्ट', कंपन्यांनी उमेदवारांची भरती करताना केलेल्या लाखो पार्श्वभूमी तपासणींवर (बॅकग्राऊंड चेक्स) आधारित आहे. अपिंदर सिंग (ईवाय इंडियाचे सर्व्हिसेस प्रमुख) यांनी सांगितले, की 'उमेदवारांची पार्श्वभूमी तपासणीसंबंधी समस्यांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. अनेक कंपन्यांची तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याची घाई देखील या फसवणुकींना कारणीभूत आहे.

## व्यावहारिक जीवनात शकुनांचा अर्थ

रस्त्याने जाताना गरुड पक्षी डोक्यावरून उडत गेल्यास ती महत्त्वाच्या कामांत यश मिळणार असल्याची पूर्वसूचना असते. घरात चिमण्यांचा वावर असणे उत्साहवर्धक, एकोप्याचे व शांततेचे वातावरण समजावे. घरातील कोपऱ्यात पक्ष्यांनी घरटे केल्यास शुभ असते.

# भगवान शंकराची बारा ज्योतिर्लिंगे कोणती? ती जाणून घेवूयात

**देशभरात भगवान शिवाची १२ ज्योतिर्लिंगे आहेत. ज्योतिर्लिंगाचा अर्थ प्रकाशस्तंभ आहे, आणि असे मानले जाते की आज ज्या १२ ठिकाणी भगवान शिवाचे ज्योतिर्लिंग आहे, त्या ठिकाणी आजही शिवजी ज्योती रुपात विराजित आहेत आणि त्या जागेचे रक्षण करतात. म्हणूनच आपल्या हिंदू धर्मात या १२ ज्योतिर्लिंगांचे महत्त्व खूप जास्त आहे. एवढेच नाही तर, असे म्हटले जाते की जो कोणी बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतो, त्याला मोठे भाग्य प्राप्त होते आणि मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त होतो.**

**जर आपण ज्योतिर्लिंगाच्या अर्थाबद्दल बोललो, तर ते दोन शब्दांनी बनलेले आहे, पहिले ज्योति आणि दुसरे लिंग. याचा अर्थ भगवान शिवाचा प्रकाश आहे, जो आपल्या देशातील १२ वेगवेगळ्या प्रदेशात प्रकाशाच्या रूपात प्रकट झाला होता, त्याला ज्योतिर्लिंग असे नाव देण्यात आले. चला तर मग पुढे जाऊन तुम्हाला ज्योतिर्लिंगाच्या उत्पत्तीबद्दल थोडी माहिती देऊ.**

**ज्योतिर्लिंगाची उत्पत्ती कशी झाली ? – त्याच्या उत्पत्तीमागे एक आख्यायिका आहे, असे म्हटले जाते की एकदा भगवान ब्रह्मा आणि विष्णू दोघांमध्ये श्रेष्ठ देवता कोण यावर आपापसात वाद घालत होते, तेव्हा असे म्हणतात की तेथे शिव प्रकट झाले, आणि ते ज्योतीच्या रूपात प्रकट झाले. त्यांनी ब्रह्माजी आणि विष्णूजी दोघांनाही सांगितले की, या प्रकाशाचा अंत साधून दाखवा, ज्याने त्याचा अंत साधला तोच सर्वश्रेष्ठ देव आहे. त्यामुळे ब्रह्माजी आणि विष्णूजी दोघेही या प्रकाशाचा अंत शोधण्यासाठी प्रयत्न करू लागले, परंतु लाखो वेळा प्रयत्न करूनही त्यांना या प्रकाशाचा अंत सापडला नाही. त्यानंतर असे म्हणतात की शिवजींनी हा प्रकाश पृथ्वीवर टाकला आणि तो आपल्या देशात १२ वेगवेगळ्या ठिकाणी प्रकट झाला.**



## १. सोमनाथ ज्योतिर्लिंग

जर आपण १२ ज्योतिर्लिंगांपैकी पहिल्या ज्योतिर्लिंगाबद्दल बोललो तर सोमनाथ ज्योतिर्लिंग पहिल्या क्रमांकावर येते. हे आपल्या भारतातील गुजरात अंतर्गत सौराष्ट्र नावाच्या प्रदेशात स्थित आहे. असे म्हटले जाते की आपल्या संपूर्ण पृथ्वीवरील हे पहिले ज्योतिर्लिंग आहे, ज्याची स्थापना आपल्या जगात प्रथम झाली. या ठिकाणी सोमनाथ कुंड म्हणून ओळखले जाणारे एक कुंड आहे, ज्याची निर्मिती देवी-देवतांनी मिळून केली असल्याचे सांगितले जाते.

इतकंच नाही तर इथली श्रद्धा आहे की या तलावात जाऊन स्नान केल्यास व्यक्तीला सर्व पापांपासून मुक्ती मिळते आणि मृत्यूनंतर मोक्षाची प्राप्ती होते. हे मंदिर सर्वप्रथम चंद्र देव जी यांनी बांधले होते, ज्यांना जीने की सोम या नावाने देखील ओळखले जाते, त्यामुळे या मंदिराचे नाव सोमनाथ मंदिर पडले. या मंदिरात तुम्हाला दिसणारा सोन्याचा भाग चंद्रदेवजींनी बांधला होता आणि चांदीचा भाग स्वतः सूर्यदेवांनी बांधला होता. हे मंदिर एकूण १६ वेळा बांधले गेले आहे, कारण महमूद गझनवीने अनेक वेळा या मंदिरावर हल्ला करून ते उद्ध्वस्त केले होते.



## २. मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग

हे ज्योतिर्लिंग भारताच्या आंध्र प्रदेश राज्यांतर्गत कृष्णा नदीच्या काठी वसलेल्या श्रीशैलम नावाच्या पर्वतावर आहे. इतकेच नाही तर हे ज्योतिर्लिंग आपल्या देशातील १२ ज्योतिर्लिंगांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे, त्यामुळे याला खूप महत्त्व आहे आणि लाखो लोक येथे दर्शनासाठी येतात.

या ठिकाणी शिवाच्या ज्योतिर्लिंगाच्या स्थापनेमागे एक जुनी कथा आहे, असे म्हणतात की एके दिवशी शिवजी आणि पार्वतीजींना चिंता वाटली की गणेशजी आणि कार्तिकेयजी या दोघांपैकी कोणाचे पहिले लग्न करावे, त्यासाठी त्यांनी दोघांना विचारले. म्हंटले की जो या संपूर्ण पृथ्वीला प्रथम फिरतो, त्याचे पहिले लग्न होईल. हे ऐकून कार्तिकेयजी आपल्या मोरावर जग फिरायला गेले, पण गणेशजींनी तसे केले नाही. तो फक्त पार्वती माता आणि शिवजींना प्रदक्षिणा घालू लागले आणि म्हणाले की माझ्यासाठी तुम्ही माझे जग आहात आणि माझ्यासाठी संपूर्ण विश्व आहात. त्यानंतर शिवपार्वती गणेशजींवर प्रसन्न झाली आणि गणेशजींचा रिद्धी सिद्धीशी विवाह झाला.

जेव्हा कार्तिकेयजींना हे कळले तेव्हा त्यांना खूप वाईट वाटले, आणि ते रागावले आणि श्री शैलम पर्वतावर राहू लागले, शिव आणि पार्वतीच्या विनंतीनंतरही ते मान्य झाले नाहीत. शेवटी भगवान शिवाला आपला पुत्र कार्तिकेयाला भेटण्यासाठी ज्योतीचे रूप धारण करावे लागले, त्यानंतर ते श्रीशैलम पर्वतावर गेले आणि तेथे वास्तव्य केले, त्यामुळे शिवाचे ज्योतिर्लिंग आज मल्लिकार्जुन येथे विराजमान आहे. म्हटले जाते की ज्या दिवशी शिव कार्तिकेयाला भेटायला गेले होते, तो दिवस अमावस्या होता, त्यामुळे आजही अमावस्येला इथे शिवाचे दर्शन होते.



## ३. महाकालेश्वर ज्योतिर्लिंग

भारताच्या मध्य प्रदेश राज्यातील उज्जैन नगरीत शिवाचे मोठे मंदिर आहे जे की देशात १२ ज्योतिर्लिंगांपैकी तिसऱ्या स्थानावर आहे. असे म्हणतात की याचे दर्शन केल्याने व्यक्तीला मोक्ष प्राप्ती होते. एवढेच नाही तर महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतल्यास मृत्यूही त्या व्यक्तीला हानी पोहोचवू शकत नाही, म्हणजेच भगवान शंकराच्या कृपेने अकाली मृत्यूही टळतो. या ज्योतिर्लिंगाचा उल्लेख महाभारतात देखील बघायला मिळतो, जेणेकरून त्याचा इतिहास किती जुना असेल याची कल्पना येईल. तुलसीदासजींनीही स्वतःच्या लिखाणात या मंदिराची खूप प्रशंसा केली आहे.

विक्रमादित्याने उज्जैन शहरावर राज्य केले होते, आणि त्यानंतर कोणताही राजा येथे राहू शकला नाही, सर्वजण कोणत्या ना कोणत्या कारणाने मारले गेले आहेत, म्हणून आजच्या काळात देखील कोणत्याही राजाला किंवा नेत्याला उज्जैन शहरात रात्र काढायची नसते.




## ४. ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग

हे भारतातील १२ ज्योतिर्लिंगांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे, जे भारताच्या मध्य प्रदेश राज्यातील खंडवा जिल्ह्यात आहे. भगवान शिवाला समर्पित हे मंदिर नर्मदा नदीच्या मध्यभागी शिवपुरी नावाच्या बेटावर आहे. येथे दर्शनासाठी लाखो लोक इथे येतात आणि नुसतेच दर्शन घेतल्याने लोकांच्या खूप सर्व मनोकामना पूर्ण होतात असे म्हणतात.

या ठिकाणाबाबत अनेक जुन्या कथा आहेत, ज्यामध्ये असे म्हटले आहे की, जगात प्रवास केल्यानंतर प्रत्येक रात्री भगवान शिव रात्री झोपण्यासाठी येथे येतात. या ठिकाणी ज्योतिर्लिंग असण्याच्या कारणाविषयी बोलायचे झाले तर एका पौराणिक आख्यायिकेनुसार, नर्मदा नदीच्या तीरावर बसून मांधाताने या ठिकाणी भगवान शंकराची घोर तपश्चर्या केली होती, त्यामुळे भगवान शिव प्रसन्न झाले, आणि त्यांनी मांधाताला प्रत्यक्ष दर्शन दिले आणि त्याला वरदान मागायला सांगितले.

यानंतर मांधाताने त्याच ठिकाणी निवास करण्यासाठी शिवाकडे वरदान मागितले आणि माझे नाव आपल्याशी जोडले जावे. त्यानंतर शिवजींनी मांधाताची इच्छा पूर्ण केली, आणि त्यांनी या ठिकाणी वास्तव्य केले, त्यामुळे आज येथे ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराची स्थापना झाली, आज येथील लोक हे स्थान मांधाताच्या नावाने देखील ओळखतात.

या मंदिरात संध्याकाळची आरती खूप प्रसिद्ध आहे, येथे रात्री आरती झाल्यानंतर चौपदर लावले जाते, असे म्हणतात की येथे भगवान शिव आणि पार्वती दररोज चौसर खेळायला येतात. त्यामुळे तुम्हालाही ओंकारेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घ्यायचे असेल, तर त्यासाठी तुम्ही मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यात जाऊन या मंदिराला भेट देऊ शकता.



## ५. केदारेश्वर ज्योतिर्लिंग

केदारनाथबद्दल तुम्हाला माहिती असेलच, कारण आपल्या हिंदू धर्मातील चार धामांपैकी हे एक खास ठिकाण आहे, जिथे लाखो लोक चार धामला भेट देण्यासाठी आणि केदारेश्वर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जातात. जर आपण केदारेश्वर ज्योतिर्लिंगाविषयी बोललो, तर हे मंदिर आपल्या भारताच्या उत्तराखंड राज्यांतर्गत केदार नावाच्या हिमालय पर्वताच्या शिखरावर वसलेले आहे. जे केदारनाथचे मंदिर म्हणून ओळखले जाते आणि ज्योतिर्लिंग केदारेश्वर ज्योतिर्लिंग म्हणून ओळखले जाते. असे म्हटले जाते की जर एखाद्या भक्ताने येथे जाऊन शंकराला जल अर्पण केले तर त्याची प्रत्येक इच्छा पूर्ण होते आणि त्याला अपार सौभाग्य प्राप्त होते.

पौराणिक कथेनुसार या ठिकाणी विष्णूच्या दोन अवतारांनी म्हणजेच श्रीनर आणि नारायण यांनी मिळून भगवान शिवाची कठोर तपश्चर्या केली, एका पायावर उभे राहून त्यांनी हजारो वर्षे भगवान शिवाचे नामस्मरण केले, जेणेकरून भगवान शिव या कठीण तपस्येमुळे प्रसन्न झाले होते, त्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन देवाने त्यांना दर्शन दिले आणि या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन शिवाने या ठिकाणी आपल्या ज्योतिर्लिंगाची स्थापना केली.



## ६. भीमाशंकर ज्योतिर्लिंग

हे महाराष्ट्रातील पुण्याहून सुमारे ११० किमी अंतरावर सह्याद्री पर्वतावर शिवाचे प्रसिद्ध मंदिर आहे. हे भगवान शिवाच्या १२ ज्योतिर्लिंगांपैकी सहाव्या क्रमांकावर आहे. येथे असलेले भगवान शिवाचे शिवलिंग आकाराने थोडे जाड आहे, म्हणून याला मोटेश्वर ज्योतिर्लिंग असेही म्हणतात. असे म्हटले जाते की या ठिकाणी येऊन भगवान शंकराकडे तुमची कोणतीही इच्छा मागितली तर ती नक्कीच पूर्ण होते.

या ज्योतिर्लिंगाच्या स्थापनेबद्दल बोलायचे झाले तर असे म्हटले जाते की, कुंभकरणाचा पुत्र ज्याचे नाव भीम होते, त्याला आपल्या वडिलांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी रामजींचा सूड घ्यायचा होता, ज्यासाठी त्याने खूप तपश्चर्या केली. ब्रह्माजी त्याच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी त्यांना विजय मिळवण्यासाठी आशीर्वाद दिला. त्यानंतर भीम खूप शक्तिशाली झाला होता, त्यामुळे तो देवदेवतांनाही त्रास देऊ लागला. त्यानंतर सर्व देवी-देवता भगवान शिवाच्या आश्रयाला गेले, आणि त्यांच्याशी या समस्येबद्दल चर्चा केली, त्यानंतर शिवाजीने देवी-देवतांना आश्वासन दिले की ते ही समस्या सोडवतील, ज्याच्या जवळ शिवाजीने भीमाशी युद्ध केले आणि त्याला एका युद्धात पराभूत केले. त्यानंतर सर्व देवतांनी भगवान शिवाला या ठिकाणी वास्तव्य करण्यास सांगितले, त्यानंतर भगवान शिवांनी देवतांची विनंती मान्य केली आणि आता ज्या ठिकाणी हे भीमाशंकर ज्योतिर्लिंग स्थापित केले आहे, त्याच ठिकाणी प्रकाशाच्या रूपात स्थापना केली.



## ७. विश्वनाथ ज्योतिर्लिंग

भारताच्या काशी अंतर्गत स्थित विश्वनाथ मंदिर म्हणून ओळखले जाणारे भगवान शिवाचे एक विशाल मंदिर आहे जे आपल्या देशातील फक्त १२ ज्योतिर्लिंगांपैकी सातव्या क्रमांकावर आहे. तुम्हाला माहित असेलच की भगवान शिव कैलास पर्वतावर राहतात. एके काळी भगवान शिव आणि पार्वतीच्या लग्नानंतर, भगवान शिव कैलास पर्वतावर राहत होते, आणि पार्वती त्यांच्या वडीलांकडे होती. जिथे त्यांना बरं वाटत नव्हते. त्यामुळे पार्वतीजींनी शिवजींना वडिलांच्या ठिकाणी यावे आणि त्यांना तिथून घेऊन जावे, असा आग्रह केला. त्यानंतर शिवजी पार्वतीजींकडे गेले, आणि त्यांना तेथून काशीला घेऊन गेले, आणि त्यांनी तेथे वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला, आणि त्यांनी या ठिकाणी स्वतःची ज्योती म्हणून स्थापना केली, जिथे आता हे विश्वनाथ ज्योतिर्लिंग आहे.

म्हटलं जातं की आजच्या काळातही इथे शिवजी आहेत आणि हे शहर त्यांच्या त्रिशूळाच्या टोकावर विसावले आहे. या मंदिराचे बांधकाम ११ व्या शतकात हरिश्चंद्राने केले असले तरी, या मंदिराच्या बांधकामाचा कार्यक्रम ११ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत चालला, कारण अनेक मुघल आक्रमणांनी या मंदिरावर आक्रमण केले. विश्वनाथ ज्योतिर्लिंगाव्यतिरिक्त, हे मंदिर विश्वेश्वर ज्योतिर्लिंग म्हणून देखील ओळखले जाते, ज्याचा अर्थ जगाचा शासक अर्थात भगवान शिव स्वतः आहे. या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येथे येतात, त्यामुळे तुम्हालाही येथे यायचे असेल तर काशीला जाऊन या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊ शकता.



## ८. त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग

जर आपण त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराबद्दल बोललो तर ते आपल्या देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे, जे आठव्या क्रमांकावर आहे. जर आपण त्याच्या स्थानाबद्दल बोललो, तर ते भारताच्या महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबक नगर येथे आहे. हे गोदावरी नदीचे उगमस्थान असलेल्या ब्रह्मगिरी पर्वतावर वसलेले आहे. या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू आणि महेश म्हणजेच शिवाचे रूप धारण केलेली तीन छोटी शिवलिंगे आहेत, असे म्हणतात की या ठिकाणी दर्शन घेतल्याने भाविकांना सौभाग्य प्राप्त होते, आणि त्यांची प्रत्येक इच्छा पूर्ण होते.

एका कथेनुसार, अहिल्या देवीचे पती गौतमजी ब्रह्मगिरी पर्वतावर तपश्चर्या करत होते, त्या वेळी इतर ऋषी संत गौतमजींचा खूप हेवा करत होते, त्यामुळे एके दिवशी त्यांनी गौतमजींवर गोहत्येचा आरोप लावला. त्यानंतर सर्व संतांनी सांगितले गौतम जी तुम्हाला या गोष्टीसाठी पश्चात्ताप करायचा असेल तर तुम्हाला गंगाजीला या पर्वतावर आणावे लागेल, तरच तुम्हाला याचा पश्चाताप होईल. यानंतर गौतमजींनी या ठिकाणी भगवान शिवाची तपश्चर्या सुरू केली, त्यानंतर शिवजी आणि पार्वतीजी दोघेही प्रसन्न झाले आणि त्यांनी गौतमजींना दर्शन दिले आणि त्यांना वरदान मागायला सांगितले. यानंतर गौतमजींनी शिवजी आणि पार्वतीजींना सांगितले की तुम्ही कृपया गंगाजींना या ठिकाणी पाठवा, त्यानंतर गंगाजी म्हणाले की जोपर्यंत शिवजी येथे राहत नाहीत तोपर्यंत मीही येथे राहणार नाही. ज्यानंतर भगवान शिवाने ठरवले की आपण याला आपला प्रकाश म्हणून स्थापित करू, भगवान शिवाने हे केल्यावर गंगा देखील मान्य झाली आणि ती गोदावरी नदीच्या रूपात वाहू लागली आणि याच ठिकाणी त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग आहे.



## ९. बैद्यनाथ ज्योतिर्लिंग

बीड जिल्ह्यातील परळी येथे वैद्यनाथ अर्थात परळी वैजनाथ हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. भारताच्या झारखंड राज्यात संथाल परगण्यातील देवघर गावातही अजून एक वैजनाथ मंदिर असून हे देखील ज्योतिर्लिंगापैकी एक असल्याची मान्यता आहे. देवगिरी यादवांच्या काळात श्री करणाधिप हेमाद्रीने हे मंदिर बांधले असे सांगण्यात येत असून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे उल्लेखित आहे. या मंदिराच्या परिसरात तीन मोठी कुंडेही आहेत.

आख्यायिकेनुसार शिवाच्या या ज्योतिर्लिंगाची स्थापना केवळ रावणामुळेच झाल्याचे आपल्याला समजते, एकदा रावणाने शिवाला प्रसन्न करण्यासाठी अत्यंत कठोर तपश्चर्या केली असता त्याने त्याची सर्व मस्तकी जाळून टाकली. भगवान शिवाला समर्पित, जेव्हा ते आपले दहावे डोके कापण्यासाठी जात होते, तेव्हा भगवान शिव रावणाला प्रकट झाले आणि त्याला त्याचे इच्छित वर मागण्यास सांगितले. यानंतर रावणाने सांगितले की, मला तुला लंकेत नेऊन तेथे स्थापना करायची आहे, त्यावर शिवाने सांगितले की तू हे शिवलिंग घेऊन जा, परंतु हे लक्षात ठेवा की तू हे शिवलिंग मार्गात जेथे ठेवशील तेथे माझी स्थापना होईल.

जेव्हा रावण शिवलिंग घेऊन लंकेकडे जात होता, तेव्हा रावणाला एक लघु शंका आली, त्यामुळे त्याने परळीतील मेरूपर्वतावर शिवलिंग ठेवले. त्यानंतर शिवजींच्या सांगण्याप्रमाणे शिवजींनी तिची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आणि म्हणूनच हे ज्योतिर्लिंग येथे वसलेले आहे. एवढेच नाही तर जो कोणी भाविक या ठिकाणी येऊन या ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतो, इच्छा मागतो, त्याची मनोकामना नक्कीच पूर्ण होते, असे सांगितले जाते. म्हणूनच येथील ज्योतिर्लिंगाला कामना लिंग असेही म्हणतात.



## १०. नागेश्वर ज्योतिर्लिंग

नागेश्वर ज्योतिर्लिंग महाराष्ट्राच्या जिल्ह्यातर्गंत गुजरातच्या द्वारिका धामहून १८ किमी अंतरावर स्थित आहे. महादेवाला नागेश्वर या नावाने देखील ओळखलं जातं.

जसे की सर्वांना माहित आहे की नाग शिवाच्या गळ्यात विराजमान असतो म्हणून जर आपण कोणत्या विष किंवा या संबंधी समस्येहून त्रस्त असाल तर आपण येथे येऊन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊ शकता. याने आपल्या सर्व समस्या नाहीश्या होतील. एवढेच नाही तर शास्त्रांतून आपल्याला समजते की जर एखाद्या व्यक्तीने या ज्योतिर्लिंगाच्या उत्पत्तीची कथा सांगितली तर त्या व्यक्तीची सर्व पापे धुऊन जातात आणि त्या व्यक्तीला मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त होतो.



## ११. रामेश्वरम ज्योतिर्लिंग

भारताच्या तमिळनाडू राज्याच्या अंतर्गत असलेल्या रामनाथपुरम जिल्ह्यात भगवान शिवाला समर्पित एक मंदिर आहे, ज्याची स्थापना आपल्या देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी दुसऱ्या क्रमांकावर म्हणजेच ११ व्या क्रमांकावर आहे. इतकंच नाही तर आपल्या भारत देशातील चार धाम यात्रेतही याचा समावेश आहे, म्हणजे हे एक अतिशय प्रसिद्ध मंदिर आहे.

या ठिकाणी रामेश्वरम ज्योतिर्लिंग मंदिर असे नामकरण करण्यात आले कारण येथे भगवान रामाची पूजा केली जात होती. त्याऐवजी भगवान शिवाची पूजा करण्याचा निर्णय घेण्यात आला. कारण येथे कोणतेही मंदिर नव्हते, त्यामुळे रामजींनी हनुमानजींना कैलास पर्वतावरून शिवलिंग आणण्यास सांगितले, परंतु हनुमानजींना परत येण्यास उशीर झाला, म्हणून सीताजींनी स्वतः समुद्रकिनाऱ्यावरून शिवलिंग बांधले जे रामजींनी शिवलिंगाची पूजा केली त्यामुळे हे ज्योतिर्लिंग आहे. आणि या मंदिराला रामेश्वरम ज्योतिर्लिंग मंदिर असे नाव देण्यात आले. एवढेच नाही तर हनुमानजींनी कैलासातून आणलेले शिवलिंगही येथे आहे.




## १२. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग हे आपल्या भारतातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी शेवटचे ज्योतिर्लिंग आहे, म्हणजेच हे बाह्य ज्योतिर्लिंग आहे, जे आपल्या भारतातील महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्यातील अजिंठा आणि एलोरा या लेण्यांजवळ आहे. या जागी निपुत्रिक व्यक्तीने जर अपत्यप्राप्तीची इच्छा मागितली तर त्याला लवकरच इच्छा पूर्ण होते. या ठिकाणी ज्योतिर्लिंग असल्याच्या आख्यायिकेबद्दल बोलायचे झाले तर फार पूर्वी सुधर्मा आणि सुदेहा नावाची दोन विवाहित जोडपी राहत होती, पण त्यांना फक्त एकाच गोष्टीचे दुःख होते की ते निपुत्रिक होते, त्यांना मूल हवं होतं. त्यानंतर दुःखी होऊन, ब्राह्मणाची पत्नी सुदेहने पती सुधर्माचा विवाह तिच्या धाकटी बहीण घुष्मा हिच्याशी करून दिला, घुष्मा ही भगवान शिवाची महान भक्त होती, तिला काही दिवसात पुत्रप्राप्ती झाली. ब्राह्मण आणि घुष्माला खूप आनंद झाला, पण सुदेहाला आनंद झाला नाही कारण तिला घुष्माचा हेवा वाटत होता, म्हणून तिने मुलाला मारले. त्या मुलाच्या मृत्यूबद्दल सर्वांनी शोक व्यक्त केला, पण घुश्माने तसे केले नाही, कारण तिला माहित होते की शिवजी नक्कीच काहीतरी करेल. ती दररोज तलावाकडे जाऊन शिवाची पूजा करु लागली तेव्हा तिला तलावातून पुत्र प्राप्ती झाली, नंतर शिवाने घुश्माला दर्शन दिले आणि विचारले की तुला काय हवे, यावर तिने शिवाला येथे निवास करण्याबद्दल आग्रह केला. यानंतर शिवाने घुश्माला वरदान दिले आणि या जागी ज्योती रुपात स्थापित झाले, आणि घुश्माच्या नावाने या मंदिराचे नावाने ओळखले जाते.

# नोकरीसाठी सरकारी शिक्षकाला ३० लाख तर प्राध्यापकाला ६० लाख

शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराची मालिका केवळ कर्यालयातच सुरु असते असे नाही तर शैक्षणिक संस्थांच्या स्तरावरही मोठ्या प्रमाणात लुबाडणूक होत असते. विशेषतः शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी भरतीत मोठ्या प्रमाणात व्यवहार होत असल्याचे दिसते. ज्ञानगंगेच्या पवित्र कार्यात भ्रष्टाचाराचीही गंगाजळी वाहू लागल्याने त्याचा फटका थेट विद्यार्थ्यांना बसत आहे. अशा वशिलेबाज शिक्षकांमध्ये पश्चात्ताप नसल्याने विदयार्थ्यांच्या प्रगतीवरही त्याचा परिणाम होत आहे. शिवाय वरीष्ठ वेतनश्रेणी, निवड वेतनश्रेणी, पद्दोन्नती, मेडिकल बिल याबाबत प्रचंड आर्थिक अडवणुक व पिळवणुक करत असतात. याला काही संस्थाचालक अपवाद आहेत. मात्र त्यांची संख्या बोटावर मोजण्या इतकी आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून आधुनिक भारताच्या निर्मितीचे स्वप्न पाहणाऱ्या महापुरुषांच्या विचारांना तिलांजलि देऊन शैक्षणिक 'दुकानदारी' व्यवस्थेला प्रोत्साहन देणारे सरकारी धोरण जनकल्याणाचा गळा पोटणारे ठरत आहे. 'खाऊजा संस्कृती' च्या आगमनानंतरच्या काळात शिक्षणाचे वर्गीकरण जोरात झाले. शिक्षण हे नव्या काळात उदयोग बनले. या क्षेत्राने नवे भांडवलदार, सम्राट जन्माला घातले. तर काही भांडवलदार गुंतवणूक करण्याचे सुरक्षित क्षेत्र म्हणून परत व्यावसायिक भूमिकेतून उतरावे. या मंडळींनी एखाद्या व्यवसायाप्रमाणे शिक्षणाकडे बघायला सुरुवात केली. उदयोग कंपन्या वाढवाव्यात, तसा आपल्या शैक्षणिक संस्थांचा विस्तार वाढवला. त्यातून संस्था मोठ्या झाल्या, नावारुपाला आल्या, पण ती संस्था चालवणारे राजासारखे श्रीमंत झाले. म्हणजे शिक्षण सम्राट झाले. या शिक्षण सम्राटांनी आपल्या उंची जीवनशैलीची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यासाठी प्रत्येक गोष्टीतून खावुगिरी सुरू केलेली दिसते. यात नोकरी लागल्यापासून निवृत्ती वेतन लागू करण्यापर्यंत भ्रष्टाचाराचे कुरण पाडले गेले. नोकरी लागल्यानंतर पुन्हा संस्थाचालकांसाठी खास टक्केवारीतला कट पगारातून बाजूला काढावा लागतो. रीतसर प्रमोशनासाठी वरिष्ठांची स्वाक्षरी लागते. ही स्वाक्षरी एक लाखापासून पाच लाखापर्यंत असू शकते. म्हणजे एखाद्या दरपत्रकाप्रमाणे काही ठिकाणी उघड हे व्यवहार घडत आहेत. अगदी लहानसहान कामासाठी संबधित संस्थेतील कारकूनालाही चिरीमिरी देऊन खुश ठेवावे लागल्याचा पायंडा पडला आहे. वेतनश्रेणी, निवडश्रेणी, पद्दोन्नती, मेडिकल बिल या सगळ्यांच्याच बाबतीत भ्रष्ट मार्गाने पैसा कमविण्याचे काम अनेक संस्थांकडून होत आहे. सगळ्याच संस्थानमध्ये असे घडत नसले तरी बहुतेक ठिकाणी हा 'व्यवहार' बनला आहे.




**संस्था चालक रेट कार्ड**
**नोकरीला लावण्याचे दर**

| | |
|---|---|
| प्राथमिक शिक्षक | १५ ते २० लाख रूपये |
| माध्यमिक शिक्षक | २५ ते ३० लाख रूपये |
| जुनिअर कॉलेज प्राध्यापक | ४५ ते ५० लाख रूपये |
| सिनियर कॉलेज प्राध्यापक | ६० लाखांच्या पुढे |
| वरिष्ठ व निवड श्रेणी देण्यासाठी | ५० हजार रुपये |
| मुख्याध्यापक पदोन्नती | १ लाखापर्यंत |
| पेन्शन केस | १ ते २ लाख किंवा शेवटच्या महिन्यातील पूर्ण पगार |
| संस्था अंतर्गत बदली | ५० ते १ लाख रूपये |
| मुख्याध्यापक म्हणून मोठ्या संस्थेत बदली | २ लाख रुपये |






## हे आहे तहसीलदार यांचे सरकारी निवासस्थान

नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती येथील सरकारी निवासस्थानाची अशी अवस्था आहे. याची लाज लोकप्रतिनिधी आणि सरकारी अधिकाऱ्यांना वाटत नाही हे दुर्दैव आहे. (छायाचित्र : प्रशांत झोपाटे)

## महाकालच्या नंदी हॉल मध्ये आता फक्त महत्त्वाच्या व्हिआयपींना प्रवेश

**उजैन :** महाकालच्या नंदी हॉलमध्ये आता फक्त महत्वाच्या व्हिआयपींना प्रवेश दिला जाणार आहे. बाकी श्रद्धाळु लोकं बंदोबस्तामधूनच दर्शन घेतील. मंदिरात ह्या दिवसात होणाऱ्या गर्दीमुळे हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. रविवारपासुनच त्याची अंमलबजावणी झाली आहे.

सुट्ट्यांमुळे ह्या दिवसात मंदिरात श्रद्धाळु लोकांची जास्त गर्दी गोळा होत असते. हे बघूनच प्रशासनाने नंदी हॉलमध्ये व्हिआयपींच्या नावाने येणाऱ्या लोकांना प्रवेश बंद करावा लागला. मंदिर व्यवस्थापन समितींच्या अध्यक्ष आणि उजैन कलेक्टर रोशन कुमारांनी म्हणले आहे कि फक्त महत्वाच्या व्हिआयपींनाच नंदी हॉलमधून दर्शन घेण्याची परवानगी दिली आहे. सर्व श्रद्धाळु गणेश व कार्तिक मंडप मधून ओळीतून दर्शन घेतील.

### सामान्य लोकांना इथून प्रवेश

नियमानुसार शंख द्वारातुन प्रवेश करून शिखर दर्शन छत, कुंड, गणेश मंडप किंवा नंदी हॉल मधून दर्शन करावे. सामान्य श्रद्धाळु महाकाल लोग, मानस सरोवर सुविधा सेंटर, महाकाल टनल - १ मधुन निघून गणेश मंडपाकडे जातील. २५० रू. तिकीटवाले गेट नंबर १ मधुन प्रवेश करुन गणेश मंडप, कार्तिक मंडपाकडे बंदोबस्ता मधुनच दर्शन घेतील. गेट नंबर ४ मधून येणाऱ्या विश्रामधाम, सभा मंडप गणेश मंडप मधून दर्शन करतील.



# वणीजवळ नीरगुडा गाव सापडले





**वणी (यवतमाळ)** - सातवाहन आणि वाकाटक ह्या २००० वर्षापूर्वीच्या काळात आजच्या वनी शहराचे प्राचीन मूळ गाव हे निरगुडा नावाचे गाव होते. ह्याच गावावरून नदीला निर्गुडा हे नाव पडले, परंतु पुढे हे आदिवासी गाव विकसित होऊन वणी झाले होते परंतु हे गाव कुठे होते हे सापडत नव्हते. २०२५ मध्ये वणीचा इतिहास लिहिण्यासाठी प्रा. सुरेश चोपणे ह्यांनी तालुक्याचे संशोधन कार्य हाती घेतल्यानंतर निरगुडा हे गाव वणीजवळच दक्षिणेला आढळले. अशी माहिति संशोधक प्रा. सुरेश चोपणे ह्यांनी दिली.

प्रा. सुरेश चोपणे हे त्यांच्या वणीच्या इतिहासावरील पुस्तकासाठी मागील वर्षापासून परिसरात सर्वेक्षण आणि संशोधन करीत होते. अलीकडे में महीन्यात त्यांना वणीच्या दक्षिणेला नदीच्या किनारी निर्गुडा हे गाव सापडले. नौर म्हणजे पाणी आणि गुडा म्हणजे गाव. ह्याच नीरगुडा गावावरून नदीला निर्गुडा हे नाव पडले. हे गाव खूप प्राचीन असल्याने इथे सध्या लेखी पुरावे आढळले नाही तसेच आज इथे खळबळा मोहोल्ला (रंगनाथ नगर) वस्ती झाल्यामुळे येथील सर्व पुरावे नष्ट झाले असून केवळ प्राचीन मंदिरे तेवढी शिल्लक राहिली आहे. इथे आजही आदिवासींचे देव, भिवसन, मातामाय, अशी ४ देवळे आढळली असून १००० वर्षा पूर्वीची शिव आणि हनुमानाची देवळे येथे आढळली. निरगुडा नदीच्या पलीकडे पूर्वतीरावर सुद्धा आदिवासिंची २ मंदिरे आणि एक शिव मंदिर आढळले आहे. ह्याचाच अर्थ नदीच्या दोन्ही तीरावर निरगुडा हे गाव वसले होते. लालगुडा ह्या गावात सुद्धा भिवसन आणि मातेचे मंदिर तसेच शिव आणि गणेशाची मंदिरे आढळली. ह्यावरून लालगुडा आणि निरगुडा ही दोन्ही गावे प्राचीन काळात आदिवासींची गावे होती. ह्या ठिकाणी प्रा. सुरेश चोपणे ह्यांना आदिवासींच्या देवता आढळल्या. पुढे ह्याच गावात हिंदू लोक राहायला आली आणि त्यांनी मंदिरे बांधली. हीच वस्ती पुढे वाकाटक आणि यादव राज्यांच्या काळात वाढली आणि ती रंगनाथ स्वामी मंदिरा पर्यंत वाढली. आज जिथे वणी आहे तिथे पूर्वी खुरटे जंगल होते ब्रिटीशांनी वणीची आखणी करून शहर वसविले. प्राचीन वणीची वाढ दक्षिणेकडून उत्तरेकडे वाढली.

वणी नाव कसे पडले. वणीचे मूळ गाव हे ह्याच निरगुडा गावात आहे. जेव्हा ह्याच परिसरात हिंदू राज्यांच्या काळात व्यापार केंद्र झाले. तेव्हा येथे कापड आणि किराणा दुकाने मोठ्या प्रमाणात सुरु झाली. तेव्हा सभोवतालीच्या गावातून येथे लोक किराणा सामान घ्यायला येत असे.. किराणा दुकानदारांना वाणी 'असे म्हटल्या जात असे. ह्याच वाणी शब्दावरून ह्या मोठ्या वस्तीला वाण्यांची वस्ती असे म्हणत असे. ह्याच वाणी शब्दाचा अपभ्रंश होऊन वनी हे नाव पडले. मुस्लीम लोक वन, वून असे संबोधत होते. ब्रिटीश राज्यात इंग्रजांनी मुस्लीम लोकांच्या उच्चारावरून कागदोपत्री वून थणछ हे नाव लिहायला सुरवात केली परंतु येथील राहिवास्यांनी वनी हे नाव बदलले नाही. एकूणच सर्व अभ्यासाअंती लक्षात येते की पूर्वीचे निरगुडा हेच वाणीचे मूळ गाव असून नदीला ह्याच गावावरून निर्गुडा नाव पडले.

# म्हातारपणी लग्नाचे स्वप्न महागात

डोंबिवलीमध्ये एका ६२ वर्षीय व्यक्तीने ७३ वर्षीय महिलेशी लग्न करण्याचे आश्वासन देऊन तिची ५७ लाख रुपयांची फसवणूक झाली. पुण्यात एकत्र राहण्यासाठी फ्लॅट खरेदी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आरोपीने कर्ज घेत ३५ लाख रुपये लुटले गेले, २० लाखांचे दागिने चोरीला गेले, डेबिट कार्ड चोरीला गेले, रु. २.४ लाख रुपये काढले गेले. असे म्हटले जाते की आरोपी वृद्धाबद्दल आवश्यक असलेली विशिष्ट माहिती त्या वृद्धेकडे नाही. त्याला अटक करण्यासाठी पोलीस पुढील तपास करत आहेत.

विष्णुनगर पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टर विवेक कुमुटकर यांनी सांगितले की, डोंबिवलीतील नाना शंकरशेठ रोडवरील एका गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या वृद्ध महिलेने एका वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या लग्नाची जाहिरात वाचल्यानंतर ६२ वर्षीय पुरुषाशी संपर्क साधला.

दोघे नियमितपणे बोलू लागले आणि त्यांची भेट सुरू झाली. त्याने लग्न करण्याचे वचन दिले. पुण्यात एकत्र राहण्यासाठी फ्लॅट खरेदी करण्याचे त्यांचे स्वप्न होते. मग त्या वृद्धेला ३५ लाख रुपये ट्रान्सफर करण्यास राजी करण्यात आले.

आरोपीने आश्वासन देण्यासाठी बनावट पावत्या आणि बनावट मालमत्तेची कागदपत्रे सादर केली होती, असे अधिकाऱ्याने सांगितले. काही काळासाठी तो त्या वृद्धेच्या घरी राहायला देखील गेला.



## ॲड. कुणाल चोरडीया यांच्यावर भाजपाने आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपविली

**वणी** - ॲड. कुणाल विजय चोरडिया यांच्यावर भाजपाने आणखी एक महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. भाजप युवा मोर्चा व उत्तर भारतीय आघाडीच्या यवतमाळ जिल्हा प्रभारीपदी ॲड. कुणाल चोरडिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हि माहिती खुद्द ॲड. कुणाल विजय चोरडिया यांनी दिली.

आधी जिल्हा उपाध्यक्षपदी निवड आणि आता त्यांच्यावर विश्वास ठेवून भाजप युवा मोर्चा तसेच उत्तर भारतीय आघाडीचे यवतमाळ जिल्हा प्रभारी पद मिळाल्याने त्यांनी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष ॲड प्रफुल चव्हाण यांचे विशेष आभार मानले व सोपवलेली जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडून पक्षवाढीसाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. या निवडीबद्दल वणी शहरासह वणी विधानसभा क्षेत्रात भाजपच्या कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**भाजप युवा मोर्चा व उत्तर भारतीय आघाडीच्या यवतमाळ जिल्हा प्रभारीपदी ॲड. कुणाल चोरडीया यांची नियुक्ती**

# नागा साधूंचा इतिहास

जेव्हा कधी कुंभमेळ्याचे नाव घेतले जाते, तेव्हा सर्वात आधी आपल्या मनात काय येते? प्रचंड गर्दी, पवित्र नदीत डुबकी घेणे किंवा वातावरणात असलेली भक्ती. या सर्वांमध्ये या भव्यतेचा केंद्रबिंदू असतात हिमालयातील ते आध्यत्मिक योद्धे, ज्यांना संपूर्ण जग 'नागा' या नावाने ओळखते. भस्म लावलेल्या या संतांच्या आसपास एक रहस्याचे वलय असल्याचे जाणवते. कदाचित यासाठीच त्यांच्याविषयी जाणण्याची उत्सुकता सर्वांनाच असते. अनेक प्रश्न मनात येतात. जसे नागा साधू होतात तरी कसे? ते पूर्ण वर्ष जातात कुठे? काही अशाच प्रश्नांची उत्तरे समजून घेऊ.

### कोण आहेत नागा साधू ?

खरेतर, आदि शंकराचार्यांनी शास्त्राला वाचविण्यासाठी शस्त्र उचलण्याची आपली कल्पना साकार करण्यासाठी आखाड्यांची स्थापना केली होती, त्यांचे सैनिक आहेत नागा संन्यासी. त्यांना धर्म सैनिक किंवा योद्धा संन्यासी सुद्धा म्हटले जाऊ शकते. इतिहासात त्यांच्या शौर्याची आणि युद्ध कौशल्याची अनेक उदाहरणे आहेत. नागांनी वेळ आल्यावर इंग्रजांचाही ठामपणे सामना केला होता. आता सनातनच्या या सैन्याविषयी तरुणांना आकर्षण आणि सहभाग वाढत आहे. नुकत्याच संपलेल्या महाकुंभात आखाड्यांनी हजारो नागा संन्यासी बनविले आहेत. असे म्हटले जात आहे की, नागा झालेल्या एक तृतीयांश पेक्षा जास्त संन्याशांचे वय २० ते ३५ वर्षांच्या मध्ये आहे. मोठ्या प्रमाणात संन्यासी झालेल्या तरुणांचे विचार कठीण साधना करत स्वतःला सनातन धर्म, समाज आणि राष्ट्रासाठी समर्पित होणे असे असतात.

### पण सोपा नाही हा मार्ग

सर्व आव्हानांमधून पार पडूनच नागा होऊ शकतात. त्यासाठी त्यांना ठराविक परीक्षण, प्रशिक्षण आणि एका नियमबद्ध प्रक्रियेतून पार पडावे लागते. सुरुवातीची दोन-दीन वर्षे त्यांना आखाड्याचा इतिहास, परंपरा आणि साधू-संतांचे जीवन समजून घ्यावे लागते. गुरुसेवा करावी लागते. त्या दरम्यान गुरू पारखतात की, शिष्य कुठे मोह-मायेत तर अडकला नाहीये ना? त्यात यशस्वी होणाऱ्यांचा पंच संस्कार होतो. त्यामध्ये त्यांचे पंच परमेश्वर (चोटी गुरू, विभूती गुरू, रुद्राक्ष गुरू, भगवा गुरु आणि लंगोटी गुरू) दीक्षा देतात. त्याच्या आधी त्यांना सांसारिक जीवनात परतण्याच्या तीन संधी सुद्धा दिल्या जातात. जे टिकून राहतात त्यांना कुंभ मेळ्याच्या दरम्यान आधी अवधूत बनविले जाते आणि बीर्जाहवन संस्कार होतो. नागा संतांसाठी गुरूंच्या माध्यमातून दिला गेलेला कागद रमता पंचांकडे पाठविला जातो. रमता पंच त्यांच्या आचरणाच्या आधारे सहमती देतात. मग आचार्य महामंडलेश्वरांच्या समोर अर्धे मुंडन होते आणि मध्यरात्री गंगेत १०८ वेळा डुबकी घेऊन हवन होते. त्यानंतर पहाटे चार वाजता गंगा स्नानानंतर गुरू संन्याशाची शेंडी कापतात. नंतर संन्यासाची दीक्षा दिली जाते. दुधेश्वर पीठाधीश्वर महंत नारायण गिरी सांगतात की, संन्यास घेण्याच्या आधी पित्यांच्या सात पिढ्या आणि मातेच्या सात पिढ्या



तसेच आपले पिंडदान करावे लागते. मार्गात हिंडता- फिरता मृत्यू आल्यास मुंडण आणि तेरावा इत्यादींचा नियम नसतो.

नागा संन्यासी होण्याच्या प्रक्रियेत साधारण १२ ते १३ वर्षे लागतात. जे खूप हुशार, तीक्ष्ण बुद्धीचे असतात त्यांना दोन ते तीन वर्षांतही दीक्षा दिली जाते.

दीक्षा दिल्यानंतर दोन किंवा सहा वर्षांपर्यंत संन्याशाच्या प्रत्येक हालचालीवर कडक लक्ष ठेवले जाते. त्या दरम्यान आखाड्याच्या नियमांचे पालन करून त्यांच्या क्षमतेनुसार पदाची जबाबदारी सोपविली जाते. तथापि पाच टक्के असे संन्याशीही आहेत, जे पुन्हा गृहस्थ जीवनात परत जातात.

### कुंभानंतर कुठे जातात हे नागा?

हे नागा संत प्रयागहून बाबा भोलेनाथांच्या नगरी काशीला जाण्याच्या तयारीत होते. तिथे ते होळीपर्यंत थांबून स्मशानातील होळी खेळल्यानंतर काशीतून पुढे जातील. पण काशीनंतर ते कुठे गेले? याचे उत्तर देताना नारायण गिरीजी म्हणतात, की नागा संत देश-परदेशात पसरले आहे. कुंभानंतर बरेचसे नागा हिमालयात जातात, तर काही शहरे, गावांत जातात. दिगंबर साधू समाजात राहताना शिवण न केलेले कपडे धारण करतात. त्यांची दिनचर्या पहाटे तीन वाजता सुरू होते. ते स्वतःच अन्न शिजवून एकदा जेवण करतात. संध्याकाळी चार वाजता त्रिसंध्या करून रात्री विश्रांती घेतात.

# अचानक हायड्रा चालकाने वाहन वळवले अन् पोलिसाचा दुर्दैवी अंत

**नवी मुंबई:** नवी मुंबईतील महापे एम आयडीसी परिसरात एका हायड्रा चालकाने ट्रॅफिक कॉन्स्टेबलला चिरडले. या भीषण अपघातात पोलीस कॉन्स्टेबलचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी हायड्रा ड्रायव्हरला ताब्यात घेतलं असून प्रकरणाची नोंद करण्यात आली आहे. गणेश पाटील असं या अपघातात मृत्यू झालेल्या पोलीस कॉन्स्टेबलचं नाव असल्याची माहिती आहे.




नवी मुंबईतील महापे परिसरात हा भीषण अपघात घडल्याची माहिती आहे. मृत पोलीस कॉन्स्टेबल गणेश पाटील हे रस्त्याच्या कडेला कर्तव्यावर तैनात होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश पाटील रस्त्याच्या कडेला उभे असताना यादरम्यान हायड्रा चालकाने वाहन उजव्या बाजूला वळवले. त्यावेळी कॉन्स्टेबल गणेश पाटील हे या वाहनाखाली आल्याने चिरडले गेले. याप्रकरणी चालकाने पोलिसांना दिलेल्या जबाबात सांगितलं की, त्याने जेव्हा त्याचे वाहन वळवले तेव्हा कॉन्स्टेबल तिथे उभे असल्याचं त्याला दिसलंच नाही, जेव्हा त्याच्या ही घटना लक्षात आली होती, त्यापूर्वीच हा अपघात घडला होता.

या अपघातात गंभीर जखमी झालेले कॉन्स्टेबल गणेश पाटील यांना तातडीने वाशी येथील महानगरपालिका रुग्णालयात नेण्यात आले. परंतु तोपर्यंत खूप उशीर झालेला होता. डॉक्टरांनी गणेश पाटील यांना तपासून मृत घोषित केले. या घटनेनंतर पोलिसांनी हायड्रा चालकाला ताब्यात घेतले असून घटनेची नोंद केली आहे. सध्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. या अपघाताने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षा आणि अवजड वाहनांच्या संचालनाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांनी अधिक माहिती देताना सांगितलं की, पोलीस कॉन्स्टेबल गणेश पाटील हे कर्तव्यावर असताना हायड्रा चालकाने बाजूने येताना हलगर्जी करून गाडी चालवत पाटील यांच्या अंगावर नेली. चालकाला आम्ही ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे. मात्र, आमचा सहकारी गमावल्याने दुःख असल्याचे सांगितले. याबाबत योग्य कारवाई करण्याचे काम सुरू आहे.

# भीक मागण्यासाठी दोन वर्षांच्या बालिकेचे अपहरण

**पुणे :** पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भीक मागण्यासाठी दोन वर्षांच्या चिमुकलीचे अपहरण करणाऱ्या पाच जणांना भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. त्यात दोन महिलांचा समावेश असून, न्यायालयाने पाचही आरोपींना पोलिस कोठडी सुनावली. सुनील सीताराम भोसले (वय ५१, रा. मोतीझारा), शंकर उजन्या पवार (वय ५०,), गणेश बाबू पवार (वय ३५), शालूबाई प्रकाश काळे (वय ४५, तिघे रा. डिकमाळ, तुळजापूर, धाराशिव) व मंगल हरफुल काळे (वय १९, रा. खडकी रेल्वे लाइन वसाहत) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्याविरोधात कात्रज येथील वंडरसिटी परिसरातील वसाहतीत राहणाऱ्या कामगाराने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

तक्रारदारांच्या पत्नीने तिच्या दोन वर्षांच्या मुलीला झोळीत झोपवले होते. मध्यरात्री अचानक दुसरी मुलगी रडल्याने त्यांना जाग आली. त्या वेळी झोळीत झोपलेली मुलगी गायब असल्याचे दिसले. त्यांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी तपास करून तुळजापूर येथून तीन आरोपींना अटक केली, तर खडकीतील रेंज हिल येथून दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

तीन आरोपी सराईत गुन्हेगार आरोपी शंकर उजन्या पवार पुणे रेल्वे स्थानकात भीक मागून उदरनिर्वाह करतो. त्याच्यासह आरोपी सुनील भोसले व गणेश पवार यांच्यावर विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत, असे तपास अधिकारी सहायक निरीक्षक स्वप्नील पाटील यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.




आरोपींकडे आणखी पीडित बालके ?

या पाचही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपींनी यापूर्वीही अशा प्रकारचे गुन्हे केल्याची शक्यता असून, त्यांच्याकडे अथवा त्यांच्या टोळीकडे अधिक पीडित बालके असण्याची दाट शक्यता आहे. आरोपींचे आणखी कोणी साथीदार आहेत का, त्यांनी कट रचला आहे का, याबाबत तपासासाठी आरोपीला पोलिस कोठडी देण्याची विनंती सरकारी वकील अमर ननावरे यांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

# जुन्या वादाने केला घात

## एकाच रात्री दोघांची हत्या




**नागपूर :** उपराजधानी नागपूर शहरात अवघ्या काही तासांच्या अंतरावर दोन हत्या झाल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. दोन भागांत घडलेल्या या दुहेरी खून प्रकरणामुळे नागपूर शहर पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या छायेखाली आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या घटनांनी पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरही अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने संवेदनशील मानल्या जाणाऱ्या नागपूर शहरात एका रात्रीत दोन हत्या होणे, ही चिंतेची बाब ठरू लागली आहे.

पहिली घटना नागपूरच्या मध्यवर्ती भागात असलेल्या लकडगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुनी मंगळवारी परिसरातील गुजरी चौकात घडली. जुन्या वैमनस्यातून चार आरोपींनी हर्षल अनिल सौदागर (वय २४) या युवकावर चाकूने हल्ला करून त्याचा खून केला. आरोपी प्रज्वल कनारकर, प्रज्वल डोरले, वैभव हेडाऊ आणि राहुल शेटे हे चौघेही स्थानिक रहिवासी असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

वृत्तानुसार, हर्षल आणि मुख्य आरोपी प्रज्वल कनारकर यांच्यात काही दिवसांपूर्वी वाहन उचलण्यासंबंधी वाद झाला होता. मित्रांनी मध्यस्थी करून वाद मिटवला होता. मात्र, त्यात दडपलेला राग रविवारी रात्री पुन्हा उफाळून आला. रात्री प्रज्वल कनारकर आणि त्याचे तीन मित्र गुजरी चौकात बसले असताना, हर्षल दुचाकीवर तिथे पोहोचला आणि चारही आरोपींना धडक देण्याचा प्रयत्न केला. यावरून वाद उफाळून निघाला आणि हर्षलने शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. याचदरम्यान प्रज्वल कनारकर घरात जाऊन चाकू घेऊन आला आणि हर्षलच्या गळ्यावर सपासप वार केले.

रक्तबंबाळ अवस्थेतील हर्षलला तात्काळ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते. मात्र, पोलिसांनी काही तासांतच चौघांनाही अटक केली असून गुन्हा दाखल करून अधिक तपास सुरू केला आहे.

# माजी उपनगराध्यक्षाकडून अल्पवयीन मुलाला मारहाण

**पिंपरी :** तळेगाव दाभाडे नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष किशोर भेगडे यांच्या १४ वर्षीय मुलाला पार्टीत येऊ नको, असे म्हटल्याच्या कारणावरून संतापलेल्या भेगडे यांनी १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला बेदम मारहाण केली. यामध्ये मुलगा गंभीर जखमी झाला. गहुंजे येथील लोढा बेलमाँदो या उच्चभ्रू सोसायटीमध्ये ही घटना घडली.

किशोर छबूदास भेगडे (वय ५१) असे अटक केलेल्याचे नाव आहे. न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांच्या पोलिस कोठडी सुनावण्यात आली. मुलाची आई श्वेता शिशिर शालिनी (वय ४५, रा. बाणेर रोड, पुणे) यांनी शिरगाव-परंदवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

नेमकं काय घडलं?

वरिष्ठ पोलिस निरीक्षक विशाल पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शालिनी यांची दोन मुले व त्यांच्या वर्गातील इतर मुले-मुली यांची लोढा बेलमाँदो सोसायटीतील क्लब हाउसमध्ये पार्टी होती. या पार्टीमध्ये किशोर भेगडे यांचा मुलगा आदित्य (वय १४) याला येण्यास नकार दिला. त्यावरून आदित्य याने हा प्रकार वडील किशोर भेगडे यांना सांगितला.




संतापलेल्या भेगडे यांनी आपल्या मुलाला पार्टीत येण्यासाठी नकार देणाऱ्या दोन्ही मुलांना क्लब हाउसमधून बाहेर पडण्यास मज्जाव केला. जबरदस्तीने अडवून ठेवले. मारहाण केली. फिर्यादी यांचा मुलगा लक्ष याचा गळा आवळला. मी कोण आहे, तुला माहिती नाही, तुझ्या बापाला बोलव, तुला आज जिवंत ठेवत नाही,' अशी धमकी दिली.

लक्षच्या छाती, पोटावर बुक्क्यांनी बेदम आणि अमानुष मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या मारहाणीत लक्ष गंभीर जखमी झाला. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. किशोर भेगडे हा तळेगाव दाभाडे नगर परिषदेचा माजी उपनगराध्यक्ष आहे. त्याच्यावर खुनाचा प्रयत्न, गर्दी, मारामारी असे गंभीर स्वरूपाचे चार गुन्हे दाखल आहेत. आता अल्पवयीन मुलाला बेदम मारहाण केल्याप्रकरणी खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात झाला आहे.

## दुभाजकाला आदळून कार फुटबॉलसारखी थेट हवेत

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील धुळे सोलापूर महामार्गावर भीषण अपघात झाला. भरधाव वेगात असलेली चारचाकी वळण रस्त्यावर थेट दुभाजकावर आदळून हवेत उडाली. त्यानंतर २०० फूट अंतरापर्यंत कार दुभाजकाला घासत पुढे गेली. चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. राष्ट्रीय महामार्ग असल्याने विरुद्ध दिशेने देखील सुसाट वेगात वाहने येत होती. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातग्रस्त वाहनातील दोन जण किरकोळ जखमी झाले आहेत. या घटनेचा काळजाचा ठोका चुकवणारा संपूर्ण व्हिडिओ सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

दरम्यान या प्रकरणी स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर शहरातील धुळे सोलापूर महामार्गावर निपाणी गावाजवळ हा भीषण अपघात झाला आहे. निपाणी गावाजवळ आलेल्या वळण रस्त्यापर्यंत ही चारचाकी वेगाने आली.

वळण रस्त्यावरून जात असताना भरधाव वेगात असल्याने चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. यामुळे कार थेट दुभाजकावर चढली. भरधाव वेगात असलेली ही कार जवळपास दोनशे फूट दुभाजकावर फुटबॉलसारखी हवेत उडत गेली.

## नोकरीसाठी स्वतःच्या मुलीला विकले

**नांदेड** – शासकीय नोकरी मिळण्यासाठी अडचण येऊ नये म्हणून स्वतःच्या मुलीला विकल्याचा प्रकार नांदेडमध्ये उघडकीस आलाय. आईच्या तक्रारीवरून या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून, पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत. अनुकंपा तत्त्वावर मिळणाऱ्या शासकीय नोकरीसाठी अडचण येऊ नये - म्हणून वडिलांनी आपल्या पोटच्या मुलीला विकल्याचा प्रकार समोर आला आहे. या आरोपाखाली वडिलांवर गुन्हा दाखल झाला आहे. सुरेखा या महिलेचा २००९ साली गजानन वांजरखेडे यांच्याशी विवाह झाला होता. या दांपत्याला एक मुलगा आणि - दोन मुली झाल्या. वडिलांचे निधन झाल्याने - गजानन वांजरखेडे यांना अनुकंपा तत्त्वावर २०१८मध्ये दुय्यम उपनिबंधक कार्यालयात न शिपायाची नोकरी लागणार होती. नोकरीसाठी तिसऱ्या आपत्याची अडचण येईल म्हणून एक मुलगी दुसऱ्याला देण्याचा विचार होता. या विषयावरून दोघा पती-पत्नीमध्ये वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला, की गजाननने पत्नी सुरेखा हिला घराबाहेर हाकलून दिले. तिन्ही मुले - ही पतीकडेच राहत होती. पतीच्या घरातून ५ बाहेर पडल्यानंतर सुरेखा यांनी लोकांच्या - घरी धुणी भांडी करून गुजराण केली. मात्र तू काही दिवसांनी आपल्या एका मुलीला के पतीने एका नातेवाइकाला दिल्याची माहिती कोही महिन्यांपूर्वी सुरेखा यांना समजली.

# अंत्यविधी सुरु; मृत व्यक्ती परतली


**जळगाव** – जळगावच्या धरणगाव तालुक्यातील पाळधी गावातील रघुनाथ खैरनार ही ज्येष्ठ व्यक्ती दोन दिवसांपासून बेपत्ता झाली होती. अशातच त्यांच्या कुटुंबाने त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. परंतु ते सापडले नाहीत. त्याच वेळी पाळधी गावात असणाऱ्या रेल्वे ट्रॅकजवळ एक अनोळखी मृतदेह आढळला. त्या वेळी स्थानिक रेल्वे गार्ड व इतर व्यक्तींकडून खैरनार कुटुंबाशी संपर्क केला. खैरनार कुटुंबाने घटनास्थळी जाऊन मृतदेहाची ओळख पटवली.

मृतदेहाची ओळख पटवल्यानंतर ते शवविच्छेदनासाठी पाठवतात. हे सुरू असतानाच इकडे गावात रघुनाथ खैरनार यांच्या अंत्यसंस्काराची तयारी केली जाते. त्यांचा मृत्यू झाल्याचे सर्व नातेवाइकांना कळवण्यात येते. पाळधी गावात त्यांच्या अंत्यासंस्कारासाठी नातेवाईक जमलेले असतात आणि त्याच वेळी रघुनाथ खैरनार हे पायी चालत आपल्या घरी येताना दिसतात. हे दृश्य पाहू३न त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या नातेवाइकांना आणि गावकऱ्यांना धक्का बसतो.

पाळधी गावात असणाऱ्या रेल्वे ट्रॅकजवळ आढळलेल्या मृतदेहाची ओळख पटवताना झालेल्या गफलतीमुळे हा सर्व गोंधळ झाला. रेल्वे ट्रॅकजवळ आढळलेला मृतदेह आणि रघुनाथ खैरनार यांच्या चेहऱ्यात असलेले साम्य, सारखेच कपडे आणि हात देखील सारखेच असल्यामुळे गोंधळ उडाला. यामुळे हा मृतदेह रघुनाथ खैरनार यांचाच आहे असा समज खैरनार कुटुंबीयांचा होता. त्यांच्याकडून ओळख पटवली जाते आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला जातो. इकडे घरी अंत्यसंस्काराची तयारी देखील पूर्ण केली जाते. नातेवाईक व गावकरी जमतात. मात्र रघुनाथ खैरनार हे स्वतः चालत घरी आल्याने शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आलेला तो मृतदेह नेमका कोणाचा, हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. सध्या या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# स्विफ्ट कार थेट कॉलेज तरुणींच्या घोळक्यात घुसली

## मुलीला १०० फूट फरफटत नेलं; कोल्हापुरात भीषण अपघात






**कोल्हापूर:** कोल्हापुरातील राधानगरी तालुक्यात हिट अँड रनची एक धक्कादायक घटना समोर आली आहे. अल्पवयीन मुलांच्या टोळक्याने स्टंटबाजी करत भरधाव चारचाकी गाडी बस थांब्यावर उभ्या असलेल्या मुलींच्या घोळक्यात घुसवल्याने एका मुलीला आपला जीव गमवावा लागला आहे. कुरुकली येथील भोगावती महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थिनींबाबत गुरुवारी कॉलेज सुटल्यानंतर ही दुर्दैवी घटना घडली आहे. या भीषण अपघातात इतर तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कॉलेज सुटल्यानंतर राधानगरी तालुक्यातील कुरकली गावाजवळील एसटी बस थांब्यावर जवळपास ५० विद्यार्थी/विद्यार्थिनी बसची वाट पाहत उभे होते. दुपारी अंदाजे १.३० च्या सुमारास, भरधाव चारचाकी गाडी चालवत स्टंटबाजी करणाऱ्या अल्पवयीन मुलांनी मारुती स्विफ्ट (MH09 BB 5907) ही गाडी थेट मुलींच्या घोळक्यात घातली. या धडकेत एक विद्यार्थिनी गाडीखाली आल्याने तिला १०० मीटर फरफटत गेली. त्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या आहेत. त्वरीत मदत मिळवून जखमी विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

अपघातानंतर न थांबता चालक आणि त्याचे सहकारी गाडी घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न करु लागले होते. मात्र घटनास्थळी उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांनी तात्काळ पाठलाग करत भोगावती येथील ठीकपूर्ली फाट्यावर ही गाडी अडवली. गाडीतील चालकासह दोघा अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून उर्वरित दोघे घटनास्थळावरून पसार झाले आहेत. पोलिसांनी अपघातस्थळी पंचनामा केला असून सीपीआर रुग्णालयामध्ये दोषींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे.

या अपघातात १८ वर्षीय प्रज्ञा दशरथ कांबळे (रा. कौलव, ता. राधानगरी) हिला आपला जीव गमवावा लागला. तर अस्मिता अशोक पाटील (रा. कौलव), श्रावणी उदय सरनोबत (रा. कसबा तारळे) व श्रेया वसंत डोंगळे (रा. घोटवडे) या तिघी गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या दुर्घटनेची माहिती मिळताच अपघातस्थळी आणि सीपीआर रुग्णालयासमोर नातेवाईक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांची मोठी गर्दी जमली होती.

प्रज्ञा ही बी.एस्सी.च्या पहिल्या वर्षात शिकणारी विद्यार्थिनी होती. तर एका शाळेत प्रज्ञाचे वडील शिपाई म्हणून कार्यरत आहेत. मुलगी अभ्यासात हुशार असल्याने वडील मिळेल ते काम करुन मुलीला उच्चशिक्षित करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत होते. मात्र प्रज्ञाच्या अशा अपघाती निधनाने कुटुंबातील प्रत्येकाचं मन सुन्न झालं आहे. या घटनेनं कौलव गावावर आणि महाविद्यालयावर शोककळा पसरली आहे. तर या प्रकरणाची गंभीर स्वरूपात दखल घेऊन प्रशासनाने दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करत पालकांनीही मुलांना अशा प्रकारे गाडी हाताळायला देऊ नये, असे आवाहन भोगावती महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने अध्यक्ष दिंगबर मेडसिंगे यांनी केलं.

### जाहिर नोटीस

सर्वांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. विजय हिलाल पाटील व सौ. वर्षा विजय पाटील यांनी आमचे अशिलांना कायमखुष खरेदी देण्याचे ठरविलेले आहे. विद्यमान मालकांनी प्रस्तुतची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सुध्दा प्रस्तुतची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खात्री करुन घेण्यासाठी आमचे अशिल प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द करित आहेत. या मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, लिन, कुळ हक्क, पोटगी हक्क, बँक अटॅचमेंट, लेखी अथवा तोंडी करार मदार अथवा कोर्ट दरबार अगर अन्य स्वरुपाचा बोजा असल्यास त्यांनी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर कागदपत्रांसहित येवून आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कुणाचीही काहीही हरकत न आल्यास आमचे अशिल विद्यमान मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

परिशिष्ट

तुकडी पुणे जिल्हा पुणे पोट तुकडी तालुका हवेली व मा.दुय्यम निबंधक हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पुणे महानगरपालिका यांचे हद्दितील, गांव मौजे ''शिवणे'' येथिल स.नं. १ हिस्सा नं २, यावर बांधण्यात आलेल्या लक्ष्मी शांतीबन फेज १ सह. गृह. संस्था मर्या. मधील विंग सी मधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४०४ यांसी क्षेत्र ५५५ चौ.फूट म्हणजेच ५१.५६ चौ.मी. बिल्टअप यासी पुणे मनपा मिळकत नं. पी/आर/८८/१०२५०००० ही मिळकत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

स्नेहल रामचंद्र रायरीकर
ॲडव्होकेट
मो. नं ९९२२१०७५६४

द स्टींग ऑपरेशन

दिनांक - सोमवार ११ ऑगस्ट ते रविवार १७ ऑगस्ट २०२५



# फुकट धान्य आणि पैसे मिळतात म्हणून लोकं काम करत नाहीत : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली :** सुप्रीम कोर्ट नी निवडणुकांच्या आधी राजनीतिक गटांद्वारे मतदातांना आकर्षित करण्याकरता फुकट भेट, पैसे घोषणा करण्यावर गंभीर चिंता व्यक्त केली. कोर्टात सांगितले कि सरकारकडून फुकट धान्य आणि पैसे मिळते म्हणून लोकं काम करायला तयार होत नाहीत.

न्यायाधिश बी. आर. गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह ची पीठ नी सरकार आणि राजनीतिक गटांच्या फुकट योजानांवर प्रश्न उपस्थित करून म्हणले की राष्ट्रीय विकासाकरता मुख्यधारामध्ये सहभागी करुन घेण्याऐवजी आपण परावलंबींचा एक वर्ग बनवत आहोत. न्यायाधिश गवईंनी म्हणले की, दुर्दैवाने फुकट मिळणाऱ्या भेटीमुळे राजनीतिक गटांद्वारे मतदानाच्या ठिक आधी जाहीर केले जाते जसे कि लाडकी बहीण आणि ह्या प्रकारे वेगळ्या फुकट योजनांमुळे लोकं काम करायला तयार नाहीयेत.

त्यांनी पुढे म्हणले आहे कि, लोकांना न कमावता सुद्धा फुकट धान्य आणि पैसे मिळत आहेत, त्यामुळे ते काम करत नाहीत. त्यांनी म्हणले कि आम्ही त्यांच्या प्रति (लोकं) आपल्या (सरकार) चिंतेचे कौतुक करत आहेत पण काय हे चांगले होणार नाही काय कि त्यांना समाजाचा मुख्य प्रवाहाचा हिस्सा बनवला जावा आणि देश विकासात योगदान देण्यास प्रवृत्त केले पाहिजे? शीर्ष कोर्टाने शहरी भागात समान टीप्पण्या बेघर माणसांना आश्रयाचा अधिकार हक्कांशी संबंधित लोकांच्या हितसंबंधावर सुनावणीच्या दरम्यान या टिपण्या केल्या आहेत. निवडणुकीच्या ठिक आधी फुकटात वस्तू देण्याची घोषणेवर कोर्टाने प्रश्न उपस्थित केला आहे.



# वंदनीय बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष सेवेत



**वर्धा / डॉ. कपील मून –** वंदनीय बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्ष पूर्व विदर्भ प्रमुख विदर्भ गौरव प्रविण शर्मा यांच्या आदेशानुसार गोंड प्लॉट छत्रपती चौक येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वैद्यकीय मदत कक्षाचे ओएसडी मंगेश चिवटे, वर्धा लोकसभा संपर्क प्रमुख राजीव दीक्षित यांचे उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी पूर्व विदर्भ सहसंपर्कप्रमुख संजय सतयी, वैद्यकीय कक्षाचे वर्धा जिल्हा संपर्क प्रमुख विनोद बाभूळकर, जिल्हा प्रमुख डॉ. प्रमोद कडू, वर्धा जिल्हा ग्रामीण प्रमुख जसवंत बहादुरे सर, महिला आघाडी प्रमुख साजिया इनामदार, उपजिल्हा प्रमुख कवडू उके, समन्वयक विजय कोल्हे नानाभाऊ चावरे , वर्धा जिल्हा महिला आघाडी प्रमुख शुभांगी ठमेकर हे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. अतिथींच्या हस्ते दिप प्रज्वलन झाले. नंतर लगेच शिवसेनेचे नवनिर्वाचित पदाधिकारी बाळूभाऊ शहागडकर, वर्धा जिल्हा प्रमुख गणेशजी ईखार, जिल्हाध्यक्ष राजेशजी सराफ व वर्धा जिल्हा व्हिजेएनटी वर्धा जिल्हाध्यक्ष लांडे साहेब, सौरभ बैस, ठाकूर साहेब यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य सेवा, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत, प्रधानमंत्री जन आरोग्य अंतर्गत आयुष्यमान योजना या योजनेचा लाभ कसा मिळवावा, कर्करोग, हृदय शस्त्रक्रिया, ब्रेन ट्युमर शस्त्रक्रिया साठी आर्थिक सहायता कशी मिळवायची, दिव्यांगाकरिता असणाऱ्या कल्याणकारी योजना, कागदपत्रांची जुळवाजुळव कशी करायची याविषयी माहिती देण्यात आली. तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे वतीने रूग्णालयात उपचारासाठी रूग्णांना कशी मदत करत आहे याची सविस्तर माहिती देण्यात आली. यानंतर जिल्ह्यातील सेवाभावी डॉ. मलमे सत्य साई सेवा समिती, डॉ. तांबेकर नेत्ररोग तज्ञ, संपादक अनुपकुमार भार्गव राज्य उपाध्यक्ष मानवाधिकार आयोग, अजय सरोदे हिंगणघाट, डॉ. कपिल मून, आकाश वानखेडे, विजयराव टेंभूर्णे, मंगेश नरोले यवतमाळ या मान्यवरांचा केशरी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना अल्पोपहार व मिठाई वाटण्यात आली. कार्यक्रमास अमरावती, यवतमाळ जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## शेलारवाडी आणि कुंडमळा (पुणे) गावांचा संपर्क तुटला

**कुंडमळा –** येथील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेमुळे शेलारवाडी आणि कुंडमळा (पुणे) या गावांचा एकमेकांशी संपर्क तुटला आहे. या ग्रामस्थांना शेतीचे साहित्य आणण्यासाठी किंवा लोकलने प्रवास करण्याकरिता देहूगाव किंवा तळेगाव येथून तब्बल आठ ते दहा किलोमीटरचा वळसा घालून ये-जा करण्याची वेळ आली आहे. रांजणखळग्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवर सुमारे ३५ वर्षांपूर्वी लोखंडी पूल उभारण्यात आला होता. पूल कमकुवत झाल्यामुळे काही वेर्षांपूर्वी त्याला सिमेंट कॉंक्रीटचा मुलामा देण्यात आला होता. त्यानंतरही पुलाची दयनीय अवस्था झाली होती. पावसाळ्यात मोठ्या संख्येने पर्यटक येतात. त्यावेळी या पुलावर मोठी गर्दी होते. आता पूल कोसळल्यामुळे शेलारवाडी आणि कुंडमळा या दोन्ही गावांचा संपर्क तुटला आहे. केदारवाडी येथील ग्रामस्थांना शेतीची अवजारे व खते खरेदी करण्यासाठी इंदोरी येथे जावे लागते. कुंडमळा येथील विद्यार्थी, ग्रामस्थांना पुण्यात लोकलने जाण्यासाठी प्रवास करण्याकरिता बेगडेवाडी किंवा तळेगाव रेल्वे स्टेशन येथे जावे लागते.

# १०० पेक्षा जास्त महिलांना घातला करोडोंचा गंडा

**पुणे –** विनीत मल्होत्रा (मूळचा लखनऊ) असे नाव सांगणाऱ्याने लग्नाच्या वेबसाईटवरून घटस्फोटित महिलांना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले. १००च्या वर अशा महिलांना त्याने करोडो रुपयांना फसवले. एका ३४ वर्षीय शिक्षिकेने, ८ लाख रुपये फसवणुकीची पोलिसात तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी विनीत मल्होत्राला अटक केली.

महिलेने तक्रारीत दिलेल्या माहितीनुसार, स्वतःचे विनीत मल्होत्रा असे नाव सांगणाऱ्या या इसमाची ओळख एका लग्नाच्या वेबसाईटवर कोविडच्या काळात झाली. त्यांनी एकमेकांशी नियमित संवाद साधायला सुरुवात केली आणि नंतर लग्नाविषयी चर्चा सुरू झाली. ४ वर्षे हे संभाषण सुरू राहिले, पण आरोपीने प्रत्यक्ष भेट किंवा व्हिडिओ कॉल करणे टाळले. पोलिसांच्या माहितीनुसार, तो खोट्या गोष्टी तयार करून सांगायचा. कधी म्हणायचा, की त्याचे पालक कोविड होऊन वारले, कधी वेगवेगळ्या अडचणी सांगायचा. अशा भावनिक पद्धतीने महिलांना फसवत त्यांच्याकडून तो पैसे घेत असे. या पीडित महिलेने त्याच्याविरुद्ध ८ लाखांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक केल्याची तक्रार दिली आहे. पहिल्या महिलेकडून तक्रार आल्यानंतर पोलिसांनी चौकशी सुरू केली. आणखी एका महिलेला त्याच व्यक्तीकडून फसवणूक झाल्याचे आढळले. त्या दुसऱ्या महिलेने पोलिसांत तक्रार दाखल करण्यास नकार दिला. त्यांच्याकडून मिळालेल्या बँक खात्याच्या तपशीलातून आणि फोन क्रमांकावरून आम्ही तपास करून त्याला लखनौमध्ये अटक केली. शिवम श्रीवास्तव, असे खरे नाव असलेला. तिशीतला हा आरोपी वेब डिझायनर आहे.

चौकशी दरम्यान त्याने दिलेल्या माहितीनुसार त्याने अनेक फ्रीलान्स प्रोजेक्ट केले होते, पण एआय आधारित तंत्रज्ञानामुळे त्याचे काम बंद झाले. यानंतर त्याने फूड डिलिव्हरी एजंट म्हणूनही काम केले. पण त्यातून समाधानकारक उत्पन्न मिळत नसल्यामुळे त्याने पैसे कमावण्यासाठी घोटाळे बाजीकडे वळल्याचे कबूल केले.

## देशात ऑनलाइन जुगार, सट्टा करोडोंची रोजलूट




**मुंबई –** डिजिटल इंडिया फाउंडेशनच्या रिपोर्टमध्ये चार प्लॅटफॉर्मचे विश्लेषण करण्यात आले आहे. बेकायदेशीर सट्टेबाजांच्या साइटवर ऑर्गेनिक सर्च ट्रॅफिक १८.४ कोटी व्हिजिट आहे. ऑर्गेनिक सर्चचा हा आकडा सोशल मीडिया संचालित करत असलेल्या ट्रॅफिकपेक्षा अधिक आहे. प्रत्येक ऑपरेटर कायद्याच्या नियमांपासून वाचण्यासाठी अनेक मिरर वेबसाइट बनवून ठेवतात. संसदीय समितीने २०२३मध्ये या सट्टेबाजीबद्दल चिंता व्यक्त केली होती. या सट्टेबाजांकडून मनी लॉन्ड्रिंग आणि आतंकवादाला पैसा जातो, अशी शंकाही व्यक्त करण्यात आली होती. अवैध प्लॅटफॉर्मवर १.०९ अब्ज व्हिजिट सरळ यूआरएल असलेल्या उपभोक्त्यांमुळे निर्माण झाली आहे. नॉर्वे, यूके, डेन्मार्क, बेल्जियम आणि अमेरिका येथेही अशा प्रकारे सट्टेबाजी, जुगार वाढला होता. तिथे अशा सट्टेबाजांना मार्केटिंग करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण बसविण्यात अधिक यश मिळाले आहे.

## वैनगंगा नदीवरील जीर्ण पुल पडण्याच्या मार्गावर



**भंडारा –** जिल्ह्यातील कारधा येथे ३० फूट खोल नदीवर असलेल्या या इंग्रजकालीन पुलाला आता ९५ वर्षांचा कालावधी झालाय. त्यामुळं हा पूल दोन वर्षांपासून प्रशासनाच्या कागदोपत्री बंद असला तरी, लोकांकडून त्यांच्या सोयीचा आणि भंडारा शहराला जोडणारा जवळचा मार्ग म्हणून आजही त्याचा दिवसरात्र वापर करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्गावरील भंडारा शहरालगत वैनगंगा नदीवर कोट्यवधींचा खर्च करून मोठ्या पुलाची निर्मिती करण्यात आलीय. मात्र, तिथून असणारी वर्दळ आणि अपघाताचं प्रमाण लक्षात घेता नागरिक त्या मार्गावरून जीवघेणा प्रवास धोक्याचा समजून या जिर्णावस्थेतील पुलावरूनचं जीवघेणा प्रवास करत आहेत.

ग्रामीण भागातील मजूरवर्ग भंडाऱ्यात रोजगारासाठी येतात. तर, शहरातून ग्रामीण भागात जाणारे नोकरदारवर्ग याच मार्गाचा वापर करीत आहेत. नागरिक या पुलावरून जीवघेणा प्रवास का करतात, हे जाणून घेतलं असता. कारधा येथून वैनगंगा नदीच्या नवीन पुलाला जोडणारा डायव्हर्शन तयार करण्यात आला नसल्यामुळेच लहान आणि जीर्ण पुलाचा वापर प्रवासी, नागरिक करीत असल्याची प्रतिक्रिया काही ग्रामस्थांनी दिली. काही महिन्यांपूर्वी वैनगंगा नदीवरील कारधा नदीवरील पुल धोक्याचा असल्यानं बॅरिकेटिंग आणि सूचना फलक लावून बंद करण्यात आला होता. मात्र, आता हे बॅरिकेटिंग आणि सूचनाफलक येथे दिसून येत नाही. त्यामुळे याबाबत प्रशासनानेच आता खुलासा करणे योग्य आहे.

# पगार ५८ लाख महिना आहे, तरी आनंद नाही

मी २४ वर्षाचा सॉफ्टवेयर इंजिनीयर आहे. माझा पगार ५८ लाख रुपये आहे, कामाचा पण काही ताण नाही. बेंगलुरु सारख्या शहरात साऱ्या सुख सुविधांबरोबर रहात आहे. पण मी एकटा पडलो आहे. माझे सर्व मित्र आपल्या जीवनात व्यस्त आहेत. माझी कोणी मैत्रिण पण नाही, जिच्याकडे मी मन मोकळे करू शकेन. मी एकटा राहून आणि एकाच प्रकारचे जीवन जगून कंटाळलो आहे. मी ह्याच कंपनी मधून काम सुरु केले होते, आता इथून सोडून दुसरीकडे जाण्याची हिंमत होत नाही. नवीन आव्हाने स्विकारायला घाबरायला लागलो आहे. मी आपल्या जीवनात खुश नाही, मी काय करू? कसा खुश राहु?

आयटी प्रोफेशनल नी आपले दुःख ट्विट केले आहे. त्याच्याकडे सुखी होण्यासाठीची सर्व साधने आहेत, ती मिळाल्यावर लोकांना वाटते कि आपण खुश राहु शकु. त्यानी ट्विट केल्यावर काही लोकांचे म्हणणे आहे कि ते ही असे आयुष्य जगत आहेत जिथे पैसा आहे, सुख सुविधा आहेत पण आनंद नाही. काही जणांनी जिमला जाण्यापासून फिरायला जाण्याचेही प्रयत्न केले आहेत पण आनंद मिळाला नाही. आता इंटरनेटवर चर्चा सुरू झाली आहे कि प्रत्यक्षात पैशाने आनंद खरेदी करता येतो. याबद्दल वेगवेगळे संशोधन आहे, काही जण म्हणतात की आनंदी रहाण्यासाठी पैसा महत्वाचा आहे तर काही जणांचे म्हणणे आहे कि पैशाने आनंद विकत मिळत नाही.

युनिव्हर्सिटी ऑफ पेंसिलवोनीया मध्ये आनंदाकरता एक शोध घेतला. हा शोध व्हार्टन शाळेच्या वरिष्ठ फेलो किलिंग्सवॉर्थ म्हणतात की भरभराटी बरोबर आनंद वाढतो पण जास्त पैसा ही आनंद देऊ शकत नाही. एका दुसऱ्या शोधात म्हणले आहे की कुटुंब आणि मित्रांबरोबरच माणूस आनंदी राहू शकतो. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे म्हणून तो सुख सुविधांबरोबर आनंदी राहू शकत नाही.

## हुंड्यात मागितली किडनी

**बिहार–** मुझफ्फरपूर जिल्ह्यातील दीप्ति नावाची एक महिला पोलीस स्टेशनमध्ये पोहोचली आणि सासरच्या लोकांवर तिने तक्रार दाखल केली. तिने सासरच्यांवर आरोप केला आहे की, सासरच्या लोकांनी सुरुवातीला हुंडा आणण्यासाठी दबाव टाकला. यासाठी नकार दिला तेव्हा त्यांनी किडनी देण्याची मागणी केली. दीप्तीचे म्हणणे आहे की, तिने किडनी देण्यासाठी नकार दिला तेव्हा तिला मारहाण करण्यात आली आणि घरातून बाहेर काढण्यात आले. तिचे लग्न २०२१ मध्ये झाले. लग्नानंतर काही दिवसांतच सासरच्या लोकांचे वागणे बदलले. त्यांनी माहेरहून पैसे आणि बाइक आणण्यासाठी दबाव टाकणे सुरू केले.

# कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरीसाठी फसवणुकीचे प्रकार वाढले

**पुणे –** कंपन्यांना बनावट नोकरीचे रेकॉर्ड, खोटी शैक्षणिक पात्रता, एकाच वेळी अनेक नोकऱ्या करणे (मूनलाइटिंग) आणि एआयच्या साहायाने बनावट डॉक्युमेंट्सच्या (डीपफेक) वाढत्या घटनांना सामोरे जावे लागत आहे.

देशातील कंपन्या मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान वापरत असताना, आता नोकरीसाठी फसवणुकीचे प्रकारही वाढताना दिसत आहेत. यामध्ये बनावट रोजगार नोंदी, खोट्या शैक्षणिक पात्रता, एकाच वेळी दोन नोकऱ्या करणे (मूनलाइटिंग), तसेच ऑनलाइन मुलाखतींसाठी एआयच्या साहायाने बनावट डॉक्युमेंट्स



(डीपफेक) तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश आहे. ऑनलाइन घेतल्या जाणाऱ्या इंटरव्ह्यूमध्येही हे अनुभव अनेक कंपन्यांना येत आहेत. एका प्रसिद्ध सल्लागार संस्थेच्या अहवालात हे निष्कर्ष स्पष्टपणे मांडले आहेत.

नोकरीसाठी आयटी, आर्थिक, आरोग्य आणि व्यावसायिक सेवा, बीपीओ व केपीओ या क्षेत्रात गेल्या वर्षभरात पार पडलेल्या नोकरी प्रक्रियांच्या पार्श्वभूमीवर सर्वाधिक फसवणुकीचे प्रकार झाले आहेत.

हा अहवाल, 'फर्स्ट लाईन ऑफ डिफेन्स रिपोर्ट', कंपन्यांनी उमेदवारांची भरती करताना केलेल्या लाखो पार्श्वभूमी तपासणींवर (बॅकग्राऊंड चेक्स) आधारित आहे.

अपिंदर सिंग (ईवाय इंडियाचे सर्व्हिसेस प्रमुख) यांनी सांगितले, की 'उमेदवारांची पार्श्वभूमी तपासणीसंबंधी समस्यांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. अनेक कंपन्यांची तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याची घाई देखील या फसवणुकींना कारणीभूत आहे.

## बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या

**बीड –** गेवराई तालुक्यातील खळेगावात धक्कादायक प्रकार समोर आला. ठेवीदार सुरेश आत्माराम जाधव यांनी छत्रपती मल्टिस्टेट बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केली. जाधव यांचे छत्रपती मल्टिस्टेट बँकेत ११ लाख आणि ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये ५ लाख रुपये अडकले होते.

मुलीच्या लग्नासाठी पैशांची गरज होती. मात्र सतत बँकेच्या फेऱ्या मारूनही त्यांना रक्कम परत मिळाली नाही. या मानसिक त्रासामुळे त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं. रात्री उशिरा कुटुंबासह बँकेत गेलेले जाधव, काही वेळातच बँकेच्या गेटवर मृत अवस्थेत आढळले. या प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, मल्टिस्टेट बँकांची विश्वासार्हता पुन्हा एकदा समोर आली आहे. मुलीच्या लग्नासाठी ठेवलेले पैसे परत न मिळाल्याने बीडच्या गेवराई तालुक्यातील खळेगावात एका वडिलांनी टोकाचं पाऊल उचललं.

मुलीच्या लग्नासाठी त्यांना तातडीने पैशांची गरज होती. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून बँकेकडे फेऱ्या मारूनही त्यांना आपली रक्कम मिळाली नाही. वारंवार विनवण्या करूनही बँक व्यवस्थापनाकडून कोणतंही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने ते मानसिक तणावात्त होते.

# भारतातील या मंदिरात नैवेद्य म्हणून देतात प्राण्यांचे मांस



असेही एक मंदिर आहे तिथे प्रसाद म्हणुन दारू आणि माश्याचा नैवेदय दाखवला जातो आणि नंतर तो प्रसाद सर्व भक्तांमध्ये वाटला जातो आणि असे कोणते मंदिर आहे जिथे देवासमोर प्राण्यांचा बळी देऊन त्याच्या रक्ताने महाकालीला वाहिले जाते.

**रजरप्पा मंदिर ( झारखंड) –** झारखंड मधल्या या मंदिरात देवी छिमस्तीका ची पूजा होते आणि प्रसाद म्हणुन बकऱ्याचे मांस चढवले जाते. बळी देण्याची परंपरा खूप जुनी आहे. लोकं स्वतःच्या हाताने बकरा चढवतात आणि नंतर त्याचे मटण मंदिर परिसरात शिजवून वाटले जाते. विशेष गोष्ट अशी आहे कि मांस खूप भक्तिने देवीला चढवले जाते आणि भक्त ते प्रसाद म्हणुन खातात. तुम्ही खरे हिंदू असाल तर अभिप्रायमध्ये जय माता दि जरूर लिहा.

**मुनियांदी स्वामी मंदीर, (तामिळनाडू) –** तामिळनाडूमधील मधुराई जिह्यातील असणाऱ्या या मंदिरात दरवर्षी एक मोठी जत्रा भरते. इथे देव मुनियांदी ला मटण आणि चिकन बिर्याणिचा नैवेद्य दाखवला जातो. लोक सकाळी लवकर उठून मंदिरात देवाच्या पाया पडून गरमागरम बर्याणिचा अस्वाद घेतात.

**विमला मंदिर, पुरी (उडीसा)–** पुरीमधील जगन्नाथ मंदिर परिसरात असणाऱ्या विमला मंदिरात देवीला दुर्गा पूजा दरम्यान मासा आणि मटणाचा नैवेद्य दाखवला जातो. विशेष गोष्ट अशी कि हा सगळा प्रसाद लगेच तयार केला जातो, जेव्हा मुख्य मंदिराचे दरवाजे उघडलेले नसतात. हे मानले जाते कि देवीला हा नेवैद्य दाखवल्याने मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात.

**तरकुहला देवी मंदीर (उत्तर प्रदेश) –** गोरखपूरच्या ह्या मंदिरात दरवर्षी खूप मोठ्या संख्येने भक्त येतात खास करून चैत्र नवरात्रीच्या वेळेस. जेव्हा कोणाची मनातील इच्छा पूर्ण होते तेव्हा ते देवीला बकऱ्याचा बळी दिला जातो. यानंतर मंदिराच्या बाहेर मातीच्या मडक्यात मटण शिजवले जाते आणि सर्व भक्तांना प्रसादाच्या रूपात वाटले जाते.

**पारसीनिक कदवु मंदिर, (केरळ) –** भगवान मुत्थपनला अर्पण ह्या मंदिरात भक्त त्यांना ताडी आणि जळलेल्या माशाचा नैवेद्य दाखवतात. केरळच्या संस्कृतीमध्ये मासा एक महत्वाचा भाग आहे आणि ह्या मंदिरात परंपरेने विश्वासाचे रुप घेतलेले आहे. दाखवलेला नैवेद्य मासा आणि ताडी भक्तांमध्ये प्रसादाच्या रूपात वाटला जातो.

**कामख्या मंदिर (असम)–** असमच्या निलांचल डोंगरावर बसलेल्या ह्या शक्तिपीठात देवी कामाख्याला बकऱ्याचे मांस चढवले जाते. पुजेच्या वेळेस मंदिराचे दरवाजे बंद केले जातात आणि भक्त बाहेर वाट बघत असतात.



नैवेद्यात कांदा, लहसुणाचा वापर केला जात नाही. इथे भक्त असे मानतात कि देवी त्यांच्या तांत्रिक आणि धार्मिक सर्व इछ्या पूर्ण करते.

**तारापीठ मंदिर (पश्चिम बंगाल) –** इथे देवीला मांस आणि दारू दोन्हीचा नैवेद्य दाखवला जातो. लोक खूप श्रद्धेने बळी चढवतात आणि ते मांस प्रसादाच्या रूपात वाटले जाते. पश्चिम बंगालमध्ये खूप खोल धार्मिक अनुभव मानला जातो आणि हयात भक्तांचा विश्वास सगळ्यात वर असतो.

**दक्षिणेश्वर काली मंदिर, (पश्चिम बंगाल) –** हे मंदिर देवी कालीला अर्पण आहे आणि इथे भक्त माशाचा नैवेद्य दाखवतो. तरी इथे कोणत्याही प्राण्याला मारले जात नाही.

माशाला शिजवून खूप प्रेमाने देवीला नैवेद्य दाखवून सगळ्या भक्तांमध्ये वाटला जातो.

द स्टिंग ऑपरेशन हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ॲड. महेंद्र रामकृष्ण दलालकर यांनी श्रीहरी मीडिया पब्लिकेशन यांच्यासाठी राणे प्रकाशन, मुंबई, बेंगलोर फ्लायओवर ब्रिजसमोर, वारजे, पुणे ४११०५८ येथे छापून पुणे शहर कार्यालय, एन.के. इमेज, तिसरा मजला ग्राहक पेठे शेजारी, टिळक रोड पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक : श्री. नंदकिशोर रामदास शहाडे, समुह संपादक श्री. संजय मनोहर कर्णिक (संपादकीय जबाबदारी मुख्य संपादक यांच्यावर) कुठलाही वाद पुणे न्याय कक्षेत, व्यवस्थापन विभाग – ९३५६९२६३६१